



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक ९२ * नांदेड * बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211





# पित्रा-पुत्राचा कोठडीत मृत्यू; ९ पोलिसांना फाशीची शिक्षा

**चैन्नई (प्रतिनिधी)–** २०२० मध्ये गाजलेल्या सथानकुलम पोलीस कोठडीतील हत्या प्रकरणात न्यायालयाने मंगळवारी निकाल दिला आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठानं या प्रकरणात तमिळनाडू पोलीस दलातील ९ जणांना दोषी धरलं आहे. त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. ही घटना अतिदुर्मीळ असल्याचं न्यायालयानं निकाल देताना म्हटलं आहे. पोलिसांनी केलेला गुन्हा अतिशय निर्घृण असल्याचेही न्यायालयाने निकालात नमूद केलं आहे.

या प्रकरणी सहा वर्ष सुनावणी चालली. प्रथम अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती जी. मुथुकुमारन यांनी या प्रकरणी निकाल दिला. त्यांनी सगळ्या नऊ आरोपींना हत्या आणि अन्य संबंधित कलमांच्या अंतर्गत दोषी धरले आहे. हे प्रकरण आत्यंतिक क्रूरता आणि सत्तेच्या दुरुपयोगाचे उदाहरण असल्याचे न्यायमूर्तींनी निकालात म्हटले.

ही घटना तुतीकोरिन जिल्ह्यातील सथानकुलमशी संबंधित आहे. इथे राहणारे व्यापारी पी. जयराज आणि त्यांचा मुलगा बेन्निक्स यांचा पोलिसांच्या ताब्यात असताना मृत्यू झाला. दोघांना १९ जून २०२० रोजी पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. त्यावेळी करोना संसर्गामुळे देशभरात लॉकडाऊन सुरु होता. लॉकडाऊनच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी बाप लेकाला ताब्यात घेतलं होतं. मोबाईल ॲक्सेसरीजचं दुकान ठरलेल्या वेळानंतरही सुरुच ठेवल्याचा आरोप त्यांच्यावर होता.

पोलीस कोठडीत बाप, लेकांना बेदम मारहाण करण्यात आल्याचे तपासातून समोर आले. संपूर्ण रात्र त्यांचा छळ करण्यात आला. त्यामुळे त्यांना गंभीर जखमा झाल्या. त्यामुळे अतिरक्तस्राव झाला. हेच त्या दोघांच्या मृत्यूचे कारण ठरले. या घटनेनंतर देशभरात आक्रोश पाहायला मिळाला. पोलीस कोठडीत होणाऱ्या हिंसाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला. न्यायाची मागणी जोर धरु लागली आहे. प्रकरणाचं गांभीर्य वाढल्यानं तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता.

# आज रात्री एक संपूर्ण संस्कृती नष्ट होईल...; ट्रम्प यांचा इराणला इशारा

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)–** इराण आणि इस्रायलमधील संघर्ष आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया एक अतिशय भयानक पोस्ट शेअर करून जगाला हादरवून सोडले आहे. आज रात्री एक संपूर्ण संस्कृती नष्ट होईल, जी पुन्हा कधीही परत येणार नाही. मला हे घडावे असे वाटत नाही, पण बहुधा ते घडेल, असे विधान ट्रम्प यांनी केले आहे.

ट्रम्प यांनी इराणला ७ एप्रिल २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंतची मुदत दिली आहे. इराणने 'होरमुझची सामुद्रधुनी' जी व्यापारासाठी बंद केली आहे, ती तात्काळ खुली करावी, अशी अमेरिकेची मागणी आहे. जर इराणने हे मान्य केले नाही, तर अमेरिकन सैन्य इराणचे पूल, वीज प्रकल्प आणि पायाभूत सुविधांवर बॉम्बफेक करून त्यांना थेट पाषाण युगात पाठवेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या धमकीनंतर इराणमध्ये संतापाची लाट आहे.

# विभागीय महसूल क्रीडा स्पर्धेत नांदेड जिल्हा अव्वल

## सर्वसाधारण विजेतेपदाची परंपरा कायम राखली

**नांदेड (प्रतिनिधी)–** दि. ३, ४ व ५ एप्रिल २०२६ दरम्यान परभणी येथे आयोजित विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६ उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत नांदेड जिल्ह्याने तब्बल ३५५ गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद पटकावत आपली परंपरा कायम राखली. जालना जिल्हा २२१ गुणांसह द्वितीय, तर आयोजक परभणी जिल्हा तृतीय क्रमांकावर राहिला.

नांदेड जिल्ह्यातील १९८ खेळाडूंनी क्रीडा स्पर्धेत, तर ४२ कलाकारांनी सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग घेतला. सांघिक क्रीडा प्रकारात कबड्डी, व्हॉलीबॉल, थ्रो बॉल व ४१०० रिले (पुरुष) मध्ये प्रथम क्रमांक मिळवत नांदेडने दमदार कामगिरी केली. तसेच खो-खो (पुरुष), ४५० जलतरण रिले, संचलन, ४१०० व ४४०० रिले (महिला) मध्ये द्वितीय, तर टर्फ क्रिकेट (महिला), खो-खो (महिला) व जलतरण ४५० रिले मध्ये तृतीय क्रमांक मिळवला.

वैयक्तिक क्रीडा प्रकारातही नांदेडच्या खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन करत जलतरण, बॅडमिंटन, टेबल टेनिस, धावणे, लांब उडी, थाळी



फेक, बुद्धिबळ, कॅरम आदी विविध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावले. इतर अनेक प्रकारात द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत जिल्ह्याने आपले अव्वल स्थान अधिक बळकट केले.

सांस्कृतिक स्पर्धेतही नांदेड जिल्ह्याची कामगिरी तितकीच उल्लेखनीय ठरली. एकूण १५ कलाप्रकारांपैकी १२ प्रकारात उत्कृष्ट सादरीकरण करत जिल्ह्याने सांस्कृतिक विभागातही प्रथम क्रमांक मिळवला. उत्कृष्ट निर्मितीसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, तर उत्कृष्ट निवेदनासाठी डॉ. रत्नदीप गायकवाड व छाया नागर्थवार यांना प्रथम क्रमांक मिळाला.

विशेष म्हणजे, वैयक्तिक गायन स्पर्धेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनीही प्रथम क्रमांक मिळवत सर्वांचे लक्ष वेधले. याशिवाय युगल नृत्य, समूह नृत्य व दंडार या आदिवासी लोककलेलाही प्रथम क्रमांक मिळाला. प्रियंका पवार-कर्डिले यांच्या समूह गायन चमूला द्वितीय पारितोषिक मिळाले. 'झाशीची राणी' या एकपात्री अभिनयासाठी डॉ. प्रणिता काळे, तसेच मीना सोलापुरे व परमेश्वर वारे यांच्या युगल गायनाला द्वितीय क्रमांक मिळाला. वैयक्तिक नृत्य प्रकारात धम्मदिना हनवते यांच्या लावणीला तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी नांदेड डॉ.सचिन खल्लाळ, उपजिल्हाधिकारी प्रियंका पवार कर्डिले, संतोषी देवकुळे, प्रवीण मेंगशेट्टी, अविनाश कांबळे, क्रांती डोंबे, जिल्हा पुरवठा अधिकारी जगदीश बारदेवाड यांच्यासह इतर सर्व तहसिलदार, नायब तहसिलदार, सहाय्यक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहाय्यक, शिपाई व महसूल सेवक तसेच महसूल संघटनांचे विविध पदाधिकारी लक्ष्मण नरमवार, मुगाजी काकडे, उदयकुमार मिसाळे, संजय नागमवाड, गिरीश येवते, नन्हू कानगुले, मधुकर वाठोरे, विश्वांभर जोंधळे, सुधाकर डोईवाड इ. नी परिश्रम घेतले. विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धा हया खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.

# आता पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा; नव शैक्षणिक धोरण

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची (२०२०) अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष (ऑनर्स आणि ऑनर्स विथ रिसर्च) सुरू करण्यास राज्य शासनाने अधिकृत मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना आता पदवीस्तरावरच संशोधनाची संधी मिळणार आहे.

# जि.प.च्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख निलंबित

## अंदाज समिती येण्यापूर्वीच निलंबनाच्या कारवाईमुळे खळबळ

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी आपल्या कर्तव्यात सतत कसूर केल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबन काळात त्यांचे मुख्यालय परभणी असणार असल्याचे निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

राज्याची महत्त्वाची समजली जाणारी अंदाज समिती ८ एप्रिलपासून नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहे. यापूर्वीच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांना निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागले आहे. डॉ. संगीता देशमुख या वारंवार कर्तव्यात कसूर करत असून त्यांच्याविरुध्द विविध प्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याने त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी करण्याचे योजिले आहे.

राज्याचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ च्या पोटनियम (१) (अ) मधील तरतुदीनुसार डॉ. संगीता देशमुख यांना दि. ७ एप्रिलपासून राज्य शासनाचे आरोग्य विभागातील कार्यासन अधिकारी अनिल कुमेरीये यांनी निलंबित केले आहे.

हा आदेश अंमलात असेल तेवढ्या कालावधीत डॉ. संगीता देशमुख यांचे मुख्यालय जिल्हा रुग्णालय, परभणी येथे राहील आणि त्यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

हे निलंबन आदेश जोपर्यंत अंमलात आहेत, तोपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १६ मधील तरतुदीनुसार डॉ. संगीता देशमुख यांना खाजगी नोकरी स्वीकारता येणार नाही, अथवा स्वतःला व्यापार अथवा उद्योग धंद्यामध्ये गुंतवून घेता येणार नाही. जर निलंबनाधीन असताना डॉ. संगीता देशमुख यांनी खाजगी नोकरी स्वीकारली अथवा स्वतःला व्यापार किंवा उद्योगधंद्यामध्ये अडकवून घेतले तर त्यांनी गैरवर्तन केल्याचे समजण्यांत येऊन नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद केले आहे.

# सोशल मीडियावर पिस्तुल, तलवार, खंजर दाखविणाऱ्यांना दणका

## १५ जणांवर गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात मागील चार-पाच दिवसांमध्ये गुन्हेगारी वृत्तीच्या तरुणांचे गुन्हेगारांकडूनच खून झाल्यानंतर शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटना घडल्यानंतरही काही तरुण आपल्या फेसबुक, इंस्टाग्राम अशा सोशल मीडियाच्या अकाऊंटवर हातात पिस्तूल, तलवार, खंजर घेऊन आम्ही दादा आहोत, असे दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्या नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तब्बल १५ जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल करून त्यांना चांगलाच इंगा दाखवला.

नांदेड शहरासह जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात तरुण मंडळी सोशल मीडियावर सक्रीय आहे. या सोशल मीडियाचा वापर चांगल्या कामासाठी करण्याऐवजी समाजात तेढ निर्माण होईल असे कृत्य करीत आपण इतरांपेक्षा वेगळे कसे हे दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत. यामध्ये हातात घातक शस्त्र ज्यात पिस्तूल, तलवार, खंजर धरून आपल्याच इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्विटरवर व्हायरल करून दहशत पसरण्याचा प्रयत्न केला जात आहे. शहरात लागोपाठ गुन्हेगारांमध्ये झालेल्या हाणामारीनंतर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून सायबर सेलने शहर व जिल्ह्यातील सर्व सोशल माध्यमांवर करडी नजर ठेवली आहे. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल १५ जणांना पोलिसांनी अटक करून त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.





यात दिलीप शंकर कांबळे, मोहम्मद समी गुलाम दस्तगीर रा. बिलाल नगर, शेख शमी शेख रऊफ रा. असद कॉलनी, विनायक सुदाम पांचाळ रा. काकांडी, महेश संतोष गायकवाड रा. हडको, योगेश मारुती अनपूर्वे रा. नेरली, मुक्ता महादेव पुरी, विष्णू ठाकूर, संजय धोत्रे, बावरी यांच्यासह १५ जणांविरुद्ध नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हे दाखल करून त्यांना पोलिसांनी समज दिली आहे. यापुढे तरुण मंडळीने सोशल मीडियाचाा वापर जपून करावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# सोनू कल्याणकरच्या तीन मारेकऱ्यांना पोलीस कोठडी

## एकावर उपचार सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या श्रीनगर भागात अनिकेत उर्फ सोनू कल्याणकर याच्यावर प्राणघातक हल्ला करून त्याचा खून करण्यात आला. या प्रकरणात पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. त्यातील एक जण पोलिसांच्या फायरिंगमध्ये जखमी झाल्याने त्याच्यावर सध्या नांदेडच्या विष्णुपुरी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मंगळवारी तीन आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत पाठवले आहे.

मयत सोनु कल्याणकर याचे वडील अशोक माधवराव कल्याणकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ते पत्नी व मुलगा सोनू यांच्यासह श्रीनगर परिसरात वास्तव्यास आहेत. घटनेच्या दिवशी सोनूचा मित्र घाबरलेल्या अवस्थेत घरी येऊन काही जणांनी सोनूवर हल्ला केल्याची माहिती दिली. जखमी सोनूला तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार हा प्रकार प्रेमसंबंधातून घडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सोनूचे चंद्रविजय मंगनाळे यांच्या मुलीसोबत प्रेमसंबंध होते. या कारणामुळे संबंधित मुलीचे ठरलेले लग्न मोडल्याचा राग मनात धरून आरोपींनी कट रचून खून केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी तातडीने हालचाल करत भाग्यनगर, वजिराबाद, स्थानिक गुन्हे शाखा यांनी संयुक्त कारवाईत चार आरोपींना अटक केली.

आरोपी चंद्रविजय हौसाजीराव मंगनाळे (वय ५६, २ नाईकनगर, नांदेड), पियुष उर्फ प्रसाद उर्फ ऋषी शिवाजी शिंदे (रा. कौठा, नांदेड), मधुसूदन उर्फ कृष्णा माधव जोगदंड (वय १९, रा. वजिराबाद, नांदेड), रवी उर्फ रोहित राजेश लोट (वय २८, रा. गोवर्धनघाट परिसर, नांदेड) आणि अंकुश गजानन गंदपवाड यांना अटक केली होती. अंकुश गंदपवाड हा पोलिसांच्या फायरिंगमध्ये जखमी झाल्याने तो सध्या विष्णुपुरी येथील रुग्णालयात उपचार घेत आहे.


पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक संकेत सौराते तपास पथकातील पोलीस अंमलदार, गजानन किडे, नवनाथ गुट्टे, अदनान पठाण, राजू घुले, गंधपवाड आदींनी आरोपींना न्यायालयात हजर केले.

सरकारी वकिल ॲड. शेख सादिक यांनी पोलिसांच्यावतीने कोठडीची मागणी केली. बचाव पक्षाच्या वकिलांनी त्यास विरोध केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने पियुष उर्फ प्रसाद शिंदे, मधुसूदन उर्फ कृष्णा जोगदंड आणि रवी उर्फ रोहित लोट या तिघांना १० एप्रिल २०२६ पर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून चौथा आरोपी चंद्रविजय हौसाजीराव मंगनाळे यास न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचे आदेश दिले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शहरात एलपीजी गॅस सिलेंडरसाठी नागरीक त्रस्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरासह जिल्ह्यात गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.

आखाती देशात होत असलेल्या युद्धामुळे अस्थिरतेचे चटके सर्व जगाला बसू लागले आहेत. पेट्रोल व डिझेलवर सरकारने रेशनिंग आणल्यामुळे पेट्रोल पंपावरील लांबच लांब रांगा तुर्तास तरी थांबल्या आहेत. परंतु घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा वेळेवर होत नसल्याने नांदेड शहर व परिसरातील नागरिक त्रस्त झाल्याचे चित्र दिसत आहे. गॅस एजन्सीभोवती सकाळपासूनच गर्दी आढळून येत आहे. ऑनलाईन बुकिंग केल्यानंतर दोन-तीन दिवसांत उपलब्ध होणारे गॅस सिलेंडर आता आठवडा उलटूनही उपलब्ध होत नाही. त्यातच गेल्या काही दिवसांपासून शहरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने स्वयंपाकासाठी फक्त गॅसवर अवलंबून असणाऱ्या गृहिणींची अधिकच तारांबळ उडत असून घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची मागणी महिला वर्गातून होत आहे.




# 'नांदेड एज्युकेशन'च्या अध्यक्षपदी सीए डॉ.प्रविण पाटील, उपाध्यक्ष ॲड.प्रफुल्ल अग्रवाल, सचिव प्रा.श्यामल पत्की



**नांदेड (प्रतिनिधी)–** हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्रता सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी सीए डॉ.प्रविण पाटील तर उपाध्यक्षपदी ॲड.प्रफुल्ल अग्रवाल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सचिव प्रा.श्यामल पत्की कुरुंदकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सीए डॉ.प्रविण पाटील हे मागील पंचाहत्तर वर्षातील या संस्थेचे चौथे अध्यक्ष झाले आहेत.

प्रकृतीच्या कारणास्तव माजी खा.डॉ.व्यंकटेश काब्दे यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदासाठी कार्यकारिणीने सर्वमताने प्रभारी अध्यक्ष सीए डॉ.प्रविण सदाशिवराव पाटील यांची तर उपाध्यक्षपदी ॲड.प्रफुल्ल राधाकृष्ण **(पान ५ वर...)**

### विद्यार्थी ते संस्थेचे अध्यक्ष

सीए डॉ.प्रविण पाटील यांचे शिक्षण पीपल्स महाविद्यालयात झालेले आहे. संस्थेचा विद्यार्थी ते कार्यकारिणी सदस्य, उपाध्यक्ष आणि आता अध्यक्ष असा प्रवास त्यांनी केला. विशेष म्हणजे, संस्थेच्या इतिहासात प्रथमच संस्थेच्या एका विद्यार्थ्याला अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# महाराष्ट्र अमली पदार्थाच्या विळख्यात?

महाराष्ट्र आणि पंजाब या दोन राज्यांच्या संदर्भात अंमली पदार्थविरोधी कायद्यांतर्गत नोंदवलेल्या गुन्ह्यांची आकडेवारी अलीकडे एक वेगळेच चित्र समोर आणते. अनेक वर्षांपासून देशातील अमली पदार्थांच्या समस्येचा केंद्रबिंदू म्हणून पंजाबकडे पाहिले जाते. मात्र आकडेवारी सांगते की, महाराष्ट्रात या अंतर्गत गुन्ह्यांची संख्या पंजाबपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. हा विरोधाभास प्रथमदर्शनी गोंधळात टाकणारा असला तरी त्यामागील वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात दरवर्षी १५,००० ते २०,००० दरम्यान गुन्हे नोंदवले जातात, तर पंजाबमध्ये ही संख्या साधारणपणे ८,००० ते १२,००० दरम्यान राहते. या फरकामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो की, महाराष्ट्रात खरंच अमली पदार्थांचे प्रमाण अधिक आहे का, की तेथील अंमलबजावणी यंत्रणा अधिक सक्रिय आहे? याचे उत्तर केवळ आकडेवारीत नाही, तर त्या मागील यंत्रणेत आणि सामाजिक वास्तवात दडलेले आहे. महाराष्ट्र हे मुंबई, पुणे यांसारख्या महानगरांमुळे देशांतर्गत वापर आणि आंतरराष्ट्रीय तस्करीच्या मार्गांच्या संगमावर आहे. विस्तीर्ण किनारपट्टी, मोठी बंदरे, आणि आर्थिक व्यवहारांचे केंद्र असलेले हे राज्य अमली पदार्थांच्या हालचालीसाठी नैसर्गिकदृष्ट्या संवेदनशील ठरते. त्यामुळे येथे अंमलबजावणीची यंत्रणा अधिक सजग आणि आक्रमक असणे अपरिहार्य आहे. विशेष अंमली पदार्थविरोधी पथके, नियमित छापे, आणि तांत्रिक देखरेखीवर आधारित तपास ही याची उदाहरणे आहेत. परिणामी, अधिक गुन्हे नोंदवले जाणे हे केवळ समस्येचे द्योतक नसून ती शोधण्याची क्षमता अधिक असल्याचेही संकेत असू शकतात. याउलट पंजाबमधील परिस्थिती काहीशी वेगळी आहे. येथे अमली पदार्थांचा प्रश्न मुख्यतः सेवनाशी संबंधित मानला जातो. सीमावर्ती भागातून होणारी तस्करी, बेरोजगारी, आणि सामाजिक-आर्थिक अडचणी यामुळे व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिक असल्याचे अनेक अभ्यास सूचित करतात. मात्र, अंमलबजावणी यंत्रणेबाबत वारंवार असंगतता, राजकीय हस्तक्षेप, आणि मोठ्या तस्करी साखळ्यांऐवजी छोट्या वापरकर्त्यांवर कारवाई करण्याची प्रवृत्ती यावर टीका होत आली आहे. त्यामुळे कमी नोंदवलेले गुन्हे हे कमी समस्येचे निदर्शक नसून, अंमलबजावणी आणि वास्तव यातील तफावत दर्शवू शकतात. यामध्ये या कायद्याची रचना देखील महत्त्वाची भूमिका बजावते. या कायद्यात वापरकर्ते आणि तस्कर यांच्यात प्रक्रियात्मक पातळीवर फारसा फरक केला जात नाही. परिणामी, लहान प्रमाणात पदार्थ बाळगणाऱ्यांवरही गुन्हे दाखल होतात, ज्यामुळे आकडेवारी वाढते; पण यामुळे मोठ्या तस्करी साखळ्यांवर कितपत परिणाम होतो, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. महाराष्ट्रातील वारंवार तपासणी आणि अडथळे निर्माण करण्याच्या धोरणामुळे अशा लहान गुन्ह्यांची संख्या नैसर्गिकरित्या वाढते. तसेच संस्थात्मक क्षमतांमधील फरकही या आकडेवारीत दिसून येतो. महाराष्ट्रातील पोलीस दल अधिक संसाधनयुक्त, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि माध्यमांच्या देखरेखीखाली काम करणारे आहे. त्यामुळे गुन्हे शोधणे, नोंदवणे आणि त्यावर कारवाई करणे अधिक प्रभावीपणे घडते. पंजाबमध्ये मात्र राजकीय संवेदनशीलता आणि संरचनात्मक अडचणींमुळे अनेक वेळा गुन्ह्यांची नोंद कमी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर, नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या ही अमली पदार्थांच्या समस्येचे थेट मोजमाप मानणे चुकीचे ठरेल. अधिक गुन्हे म्हणजे अधिक समस्या, आणि कमी गुन्हे म्हणजे कमी समस्या, असा सरळ निष्कर्ष काढणे धोकादायक आहे. उलट ही आकडेवारी अंमलबजावणीची पातळी, धोरणांची दिशा, आणि संस्थात्मक क्षमतेचे प्रतिबिंब म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. आज गरज आहे ती आकडेवारीच्या पलीकडे जाऊन वास्तव समजून घेण्याची. अमली पदार्थांच्या समस्येवर प्रभावी नियंत्रणासाठी केवळ कडक कायदे पुरेसे नाहीत; तर त्याची अंमलबजावणी सुसंगत, पारदर्शक आणि लक्ष्यित असणे आवश्यक आहे. मोठ्या तस्करी साखळ्यांवर कठोर कारवाई करतानाच व्यसनाधीन व्यक्तींना पुनर्वसनाची संधी देणे तितकेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र आणि पंजाबच्या आकडेवारीतून एक स्पष्ट संदेश मिळतो की, संख्या आपल्याला दिशाभूल करू शकतात, जर त्या संदर्भाशिवाय वाचल्या गेल्या तर. त्यामुळे धोरणकर्त्यांनी आणि समाजानेही या आकडेवारीकडे अधिक सूक्ष्म आणि समजूतदारपणे पाहण्याची गरज आहे.

# गुणवत्तेच्या नावाखाली संधींचे केंद्रीकरण आणि वाढती शैक्षणिक विषमता

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्था, सामाजिक न्यायाची परंपरा आणि सर्वसमावेशक विकासाचा विचार करता, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेला शासन आदेश हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून, तो राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक संरचनेवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. या शासन आदेशामध्ये शिक्षक किंवा प्राध्यापक भरती किंवा शैक्षणिक पात्रतेचे मूल्यांकन करताना उमेदवाराने शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठक्र) क्रमांकाचा विचार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, परदेशी विद्यापीठांच्या बाबतीत टड, ढक्र्ए आणि ठथण (डहरपसहरळ) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पहिल्या गटामध्ये ठेवण्याचा किंवा प्राधान्य देण्याचा निकष लागू करण्यात आलेला आहे. वरकरणी पाहता हा निर्णय गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय दर्जा वाढविण्याच्या हेतूने घेतलेला वाटतो; मात्र वास्तवात तो सामाजिक विषमता वाढविणारा आणि वंचित घटकांना दुय्यम स्थान देणारा असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील शैक्षणिक वास्तवाचा विचार केला असता, छखठक्र १०० च्या आत सातत्याने स्थान मिळवणारी सार्वजनिक विद्यापीठे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ ही प्रामुख्याने पुढे येतात. याचा सरळ अर्थ असा होतो की राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्याख्या केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांपुरती मर्यादित केली जाते. परंतु हा दृष्टिकोन वास्तवापासून पूर्णतः दूर आहे. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी, दलित आणि बहुजन समाजातून येतात, ज्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत मर्यादित असते. अशा विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ सारख्या विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे केवळ प्रवेश मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते आर्थिक, सामाजिक आणि मानसिक संघर्षांचे एक मोठे आव्हान असते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहिली असता, त्यांना दरमहा होणारा खर्च परवडणेही कठीण असते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये राहण्यासाठी लागणारे भाडे, अन्न, प्रवास, शिक्षण शुल्क, पुस्तके आणि इतर आवश्यक खर्च यांचा एकत्रित विचार करता, हा खर्च हजारो रुपयांपर्यंत पोहोचतो. अशा परिस्थितीत गरीब, आदिवासी किंवा बहुजन कुटुंबातील विद्यार्थ्यांनी या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे जवळजवळ अशक्य ठरते. त्यामुळे शासन आदेशामध्ये नमूद केलेला निकष प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलतो.

या शासन आदेशाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातील निकष. टड, ढक्र्ए आणि ठथण (डहरपसहरळ) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे ही गोष्ट केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठीच शक्य आहे. परदेशात शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च हा लाखो रुपयांमध्ये असतो. यामध्ये केवळ शिक्षण शुल्कच नव्हे, तर राहणीमानाचा खर्च, प्रवास, व्हिसा, विमा आणि इतर अनेक खर्चांचा समावेश असतो. त्यामुळे गरीब किंवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी हा पर्याय व्यवहार्य नाही. अशा परिस्थितीत शासनाने हा निकष लावणे म्हणजे सामाजिक विषमता अधिकच वाढविण्याचा मार्ग मोकळा करणे होय.

याचबरोबर, या शासन आदेशातील सर्वात मोठी विसंगती म्हणजे त्याचा कालबाह्य वापर. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठक्र) ही प्रणाली भारतात २०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे २०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या काळात या क्रमवारीचा कोणताही संबंध नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लागू करणे म्हणजे त्यांच्या संधींवर अन्याय करणे होय. हा प्रकार न्याय आणि समानतेच्या मूलभूत तत्त्वांना विरोध करणारा आहे. कोणताही नियम तो लागू होण्यापूर्वीच्या कालावधीवर लावणे हे प्रशासनिक दृष्ट्या चुकीचे मानले जाते, आणि येथेही तीच चूक स्पष्टपणे दिसून येते.

या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन होण्याची प्रक्रिया सुरू होते. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक विद्यापीठे ही लाखो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची प्रमुख साधने आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येतात आणि अनेकदा उत्कृष्ट यश संपादन करतात. मात्र त्यांच्या विद्यापीठाचा छखठक्र क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी गुण दिले जातात. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य सन्मान होत नाही आणि त्यांच्या संधी मर्यादित होतात.

यामुळे एक गंभीर सामाजिक परिणाम निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढविण्याची प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो.

याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये वर्गभेद निर्माण होण्याची शक्यता वाढते. एकीकडे उच्च क्रमांकाच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सधन वर्ग, तर दुसरीकडे स्थानिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सर्वसामान्य वर्ग अशी विभागणी निर्माण होते. ही विभागणी केवळ शैक्षणिक नसून सामाजिक आणि मानसिक स्वरूपाचीही आहे. यामुळे समाजात दरी वाढते आणि समतेचा पाया कमकुवत होतो.

या सर्व पार्श्वभूमीवर, हा शासन आदेश केवळ एक शैक्षणिक धोरण नसून सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना आव्हान देणारा निर्णय ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणि समता यांचा समतोल राखणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु सध्याचा निर्णय हा समतेपेक्षा असमतोल वाढविणारा ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.

शिक्षक किंवा प्राध्यापक हा केवळ ज्ञान देणारा घटक नसून तो समाज घडविण्याचा केंद्रबिंदू असतो. विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेले शिक्षक किंवा प्राध्यापक विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन देतात. परंतु जर शिक्षक भरती प्रक्रियेमध्येच काही विशिष्ट विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना अधिक प्राधान्य दिले गेले, तर या प्रक्रियेतून येणारी विविधता कमी होईल. परिणामी, शिक्षण क्षेत्रात एकसुरीपणा निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांना विविध सामाजिक वास्तवांचा अनुभव घेण्याची संधी कमी मिळेल.

या शासन आदेशामुळे ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील उमेदवारांना शिक्षक किंवा प्राध्यापक होण्याची संधी कमी मिळण्याची शक्यता आहे. कारण बहुसंख्य असे उमेदवार हे राज्यातील स्थानिक विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले असतात. त्यांच्या विद्यापीठांचा छखठक्र क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना गुणांकनात कमी स्थान दिले जाईल. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य विचार न होता केवळ संस्थेच्या क्रमांकावरून त्यांचे मूल्यमापन केले जाईल. हा प्रकार केवळ अन्यायकारकच नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाही विरोध करणारा आहे.

संविधानाच्या दृष्टीने पाहिले असता, भारतातील प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळण्याचा अधिकार आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना पुढे आणण्यासाठी अनेक विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु या शासन आदेशामुळे या घटकांना प्रत्यक्षात स्पर्धेबाहेर ढकलले जात आहे. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते; परंतु जर शिक्षणाच्या संधीच मर्यादित केल्या गेल्या, तर सामाजिक न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरेल.

या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांच्या प्रतिमेवरही विपरीत परिणाम होतो. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील विद्यापीठे ही केवळ शिक्षण संस्था नसून त्या त्या भागातील सामाजिक आणि आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अनेक अडचणींवर मात करून पुढे येतात. परंतु त्यांच्या विद्यापीठांचा क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी लेखले जाते. यामुळे या विद्यापीठांची प्रतिष्ठा कमी होते आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.

याचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे गुणवत्तावान विद्यार्थी आणि शिक्षक किंवा प्राध्यापक हे मोठ्या शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी, स्थानिक विद्यापीठे कमकुवत होतात. त्यांच्याकडे संसाधनांची कमतरता निर्माण होते आणि त्यांच्या विकासावर परिणाम होतो. ही प्रक्रिया पुढे जाऊन शिक्षणातील प्रादेशिक विषमता अधिक वाढवते. एकीकडे पुणे आणि मुंबईसारखी पिद्यापीठे, शहरे अधिक मजबूत होतात, तर दुसरीकडे इतर भाग मागे पडतात.

या धोरणाचा मानसिक परिणामही अत्यंत गंभीर आहे. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्या शिक्षण संस्थेबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढवणारी प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः आदिवासी, दलित आणि बहुजन विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो, कारण ते आधीच सामाजिक आणि आर्थिक अडचणींना सामोरे जात असतात.

२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात ही समस्या अधिक गंभीर होते. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठक्र) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वातच नव्हती. त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी कोणतेही निर्णय घेताना या क्रमवारीचा विचार केलेला नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे होय. हा निर्णय केवळ तांत्रिकदृष्ट्या चुकीचा नाही, तर नैतिकदृष्ट्याही अयोग्य आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, हा शासन आदेश शिक्षणातील विषमता वाढविणारा, सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना बाधा आणणारा आणि राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन करणारा ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात कोणतेही धोरण राबविताना त्याचा सर्व घटकांवर होणारा परिणाम विचारात घेणे गरजेचे आहे.

पर्याय, उपाय आणि समतोल शिक्षणव्यवस्थेची गरज :-

दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता, केवळ टीका करून थांबणे पुरेसे नाही; तर त्यासाठी योग्य पर्याय आणि रचनात्मक उपाय सुचवणे ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्र हे केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून ते सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे या क्षेत्रात घेतलेले कोणतेही धोरणात्मक निर्णय हे सर्वसमावेशक, न्याय्य आणि वास्तववादी असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या शासन आदेशामध्ये गुणवत्ता या संकल्पनेचा जो अरुंद अर्थ लावण्यात आला आहे, तो बदलणे अत्यंत गरजेचे आहे.

सर्वप्रथम, उमेदवारांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट क्रमांकावर आधारित निकष लावण्याऐवजी त्यांच्या वैयक्तिक क्षमतेवर आधारित मूल्यांकन प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे ज्ञान, संशोधन क्षमता आणि सामाजिक बांधिलकी या घटकांचा विचार करून त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे. केवळ संस्थेच्या क्रमांकावर आधारित मूल्यांकन केल्यास अनेक गुणवत्तावान उमेदवार संधीपासून वंचित राहतात.

दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांना समान संधी उपलब्ध करून देणे. महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठ हे त्या त्या भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक निधी, संशोधन सुविधा, पायाभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक किंवा प्राध्यापक उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. जर सर्व विद्यापीठांची गुणवत्ता सुधारली, तर विद्यार्थ्यांना केवळ काही मोजक्या विद्यापीठांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

तिसरे म्हणजे, ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा आणि सवलती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शन केंद्रे उपलब्ध करून दिली गेली, तर काही प्रमाणात विषमता कमी होऊ शकते. परंतु दीर्घकालीन उपाय म्हणून शिक्षणाचे विकेंद्रीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातही शासनाने वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. टड, ढक्र्ए आणि ठथण सारख्या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे हे सर्वांसाठी शक्य नाही. त्यामुळे या निकषाचा वापर केवळ अतिरिक्त गुणवत्तेचा घटक म्हणून करावा, तो अनिवार्य निकष म्हणून लावू नये. अन्यथा हा निकष केवळ सधन वर्गासाठीच फायदेशीर ठरेल.

२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांसाठी स्वतंत्र धोरण तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (छखठक्र) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे अन्यायकारक आहे. अशा उमेदवारांसाठी त्यांच्या अनुभव, कार्यक्षमता आणि इतर गुणांवर आधारित मूल्यांकन प्रणाली तयार केली पाहिजे.

याचबरोबर, शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता या संकल्पनेचा व्यापक अर्थ स्वीकारणे गरजेचे आहे. गुणवत्ता म्हणजे केवळ उच्च क्रमांकाच्या संस्थेत शिक्षण घेणे नव्हे, तर त्या शिक्षणाचा समाजावर होणारा परिणाम महत्त्वाचा असतो. अनेकदा ग्रामीण भागातील विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी समाजात अधिक प्रभावी कामगिरी करतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाचा योग्य सन्मान करणे आवश्यक आहे.

शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करताना सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील कोणतेही धोरण हे केवळ काही मोजक्या लोकांसाठी नव्हे, तर सर्व घटकांसाठी फायदेशीर असावे. अन्यथा अशा धोरणांमुळे समाजात असंतोष निर्माण होण्याची शक्यता असते.


या संदर्भात, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि न्याय्यता सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवारांची निवड करताना त्यांच्या वास्तविक गुणवत्तेचा विचार केला गेला पाहिजे. तसेच, विविध सामाजिक पार्श्वभूमीतील उमेदवारांना समान संधी मिळेल याची खात्री करणे गरजेचे आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रात विविधता टिकून राहील आणि विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन मिळेल.

११ फेब्रुवारी २०२६ चा शासन आदेश हा गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने घेतलेला असला, तरी त्याचे परिणाम विचारात घेतले असता तो सामाजिक विषमता वाढविणारा ठरतो. त्यामुळे या निर्णयाचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा गुणवत्ता या नावाखाली आपण नकळतपणे समाजात असमानता वाढवत आहोत, आणि हे कोणत्याही प्रगत समाजासाठी योग्य नाही.

-डॉ. राजेंद्र बगाटे,
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# प्रेमाविन नाही समाधान...

या शीर्षकाने लेखनाला सुरुवात करताना पहिल्यांदा सांगावेसे वाटते मी ज्या प्रेमाबद्दल बोलतोय, लिहितोय ते प्रेम म्हणजे व्हॅलेंटाईन डे साठीचे प्रेम नाही. खऱ्या अर्थाने जगण्याला अर्थ आणि बळ देणारे आजी-आजोबांचे, आई-वडिलांचे, भावा-बहिणीचे आणि निरपेक्ष हेतून माणसावर व माणुसकीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाचे प्रेम. हा माझा लिखाणाचा विषय आहे म्हणून या लेखन प्रपंचाची सुरुवात करण्यापूर्वी मी आपल्या सर्वांची माफी मागेन...खरेतर प्रेम विश्वातले आणि त्यातल्या त्यात आत्ताच्या प्रेमाच्या संकल्पनेतले मला फारसे माहित नाही. तरीही मला वाटणारे विचार, माझ्या भावना मांडण्याचा हा तुटपुंजा शब्दप्रयत्न...



नुकताच काल-परवा व्हॅलेंटाईन वीक साजरा झाला. या प्रेमाच्या आठवड्याची सांगता व्हॅलेंटाईन डे ने झाली. संपूर्ण आठवडाभर अनेक प्रेमी युगुलांनी जल्लोषात प्रेम व्यक्त केले... प्रेम साजरे केले... संपूर्णतः प्रेममय झाले....अक्षरशः प्रेमात बुडाले.... काही भरकटले सुद्धा असतील.... असो या प्रेममय जल्लोषाची व्हॅलेंटाईन डे नंतर अनेकांच्या दृष्टीने सांगता झाली. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये व्हॅलेंटाईन डे ला कुठलाही आधार नसला तरी.... निरागस आणि निर्मळ प्रेमाला आपल्या संस्कृतीत खूप मोलाचे स्थान आहे... गावागावात चालणाऱ्या कथा-कीर्तनामधून आदी-अनादी काळापासुन परंपरेने चालत असलेल्या निरागस आणि निर्विकार प्रेम भावाचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. कायमच निस्सीम आणि पवित्र प्रेमासाठी राधा-कृष्णाचे उदाहरण दिल्या जाते. शांतिब्रह्म एकनाथ महाराज सुद्धा एका ठिकाणी म्हणतात.

प्रेम सुख देई । प्रेम सुख देई ।
प्रेमा विना नाही । समाधान ।।

पण मला कायमच काही प्रश्न पडतात. प्रेम म्हणजे नक्की काय...? ते कोणावर असावं...? व्यक्त होणं म्हणजेच प्रेम असतं का...? कुणालातरी मिळवणं म्हणजेच प्रेम असतं का....? प्रेमाची सांगता होते का...? खरोखर जीवात जीव असेपर्यंत प्रेम संपते का....? माझ्या मते प्रेमाला शेवट नसतो... शेवट असतो तो अभिलाषेला..... आसक्तीला.... आकर्षणाला.... आणि सवंग लालसेला.....

जर प्रेमात अभिलाशा, आसक्ती, आकर्षण असेल तर त्याला प्रेम म्हणता येणार नाही. त्याला केवळ सवंग लालसा म्हणता येईल. ही लालसा केवळ विकारांना आमंत्रण देते. तुम्ही एका विशिष्ट हेतूने एखाद्या व्यक्तीकडे आकर्षित होता... या आकर्षणात निर्मळ, निरागस आणि पवित्र प्रेमाचा अभाव असतो. तुमची सगळी धडपड तो विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी असते.... यात पूर्णतः एकनिष्ठता सुद्धा नसते. म्हणूनच आजकालची तरूणाई अभिमानाने सांगत असते माझी एवढी प्रेम प्रकरणे आहेत...वगैरे, वगैरे....अशा प्रेमासाठी मग अशा प्रकारची निमित्त शोधली जातात. सोहळे साजरे केले जातात...नशापाणी होते..... मग या धुंदी-बेधुंदीमध्ये, कळत-नकळत, मर्यादा ओलांडल्या जातात. निरागसता, निष्पाप प्रवृत्ती संपते.... प्रेमाचं लफड होतं म्हणून ते जास्त काळ टिकत नाही. बदनामी मात्र प्रेमाची होतं राहते...

खऱ्याखुऱ्या निर्मळ प्रेमात उत्कर्ष साधल्या जातो, अध:पात नाही.... प्रेम अथांग असते, उथळ नाही.... प्रेम हसायला शिकवते, रडायला नाही.... प्रेम आनंद देते, दुःख नाही... प्रेम लढायला शिकवते, पडायला नाही.... प्रेम जगायला शिकवते, मरायला नाही... खरे प्रेम कधीच द्वेष किंवा तिरस्कार करू शकत नाही.... आणि सर्वात महत्त्वाचे खरे प्रेम कुणाला संपवू शकत नाही.... प्रेम आयुष्याची सोडवणूक करते, अडवनुक नाही.... प्रेम कायमच प्रेरणा देते, मागे ओढत नाही.

खरे प्रेम उदार अंतःकरणाचे, आणि व्यापक विचाराचे असते...खरे प्रेम शब्दांच्या पलीकडे, देहाच्या पलीकडे आणि सौंदर्याच्याही पलीकडे असते. खरे प्रेम जसे सुखात असते तसे दुःखात सुद्धा असते. जसे हसण्यात असते तसे रडण्यात सुद्धा असते. जसे सहवासात असते तसे विरहात सुद्धा असते. जसे जिंकण्यात असते तसे हरण्यातसुद्धा असते. जसे श्रीमंतीत असते तसे गरिबीत सुद्धा असते. जसे सुरुवातीला असते तसे शेवटी सुद्धा असते. जसे मिळवण्यात असते तसे गमावण्यात सुद्धा असते. जसे भेटण्यात असते तसे टाळण्यात सुद्धा असते. जसे तरुणात असते तसे वृद्धात सुद्धा असते. जसे भक्तात असते तसे भगवंतामध्ये सुद्धा असते. जसे माणसात असते तसे माणुसकी मध्ये सुद्धा असते. म्हणून म्हणतात...

हसून पहावं, रडून पहावं
जीवनाकडे माणसाने डोळे
भरून पाहावं...
काहीतरी द्यावं, काहीतरी घ्यावं
आपण गेल्यावर आपलं नाव
कुणीतरी काढावं...
माणसावर करावं, माणुसकीवर करावं
प्रेम मात्र माणसानं मनापासून
करावं...

खऱ्या प्रेमाला कुठल्याच निमित्याची गरज नसते. म्हणून खऱ्या प्रेमाला व्हॅलेंटाईन डे ची आवश्यकता नाही. प्रेमासाठी कुठलाही एक दिवस नसतो. तर खऱ्याखुऱ्या निर्मळ प्रेमात सगळे दिवस प्रेमाचेच असतात.

मुळात प्रेम ही निरागस भावना आहे. प्रेम ही संवेदना आहे. प्रेम जाणीव आहे. हाच प्रेम भाव जगामध्ये माया, ममता, वात्सल्य, जिव्हाळा, आपुलकी यासारख्या विविध आणि अनंत रूपात पाहायला मिळतो...अनुभवायला मिळतो... ह्या प्रेम रुपी भावना, जाणिवा आणि संवेदना जोपर्यंत आपल्या हृदयात आहेत तोपर्यंतच आपण जिवंत आहोत. म्हणून या अर्थाने प्रेम हे जीवन आहे.

-मयूर मधुकरराव जोशी
विठ्ठल-रुक्मिणी नगर, जिंतूर.
मो. ९७६७७३३५६०

# भारत-नेपाळ संबंध सुधारतील?

नेपाळ हा भारताचा शेजारी देश असून भारताच्या मित्र देशांपैकी एक देश आहे. भारत आणि नेपाळची संस्कृतीही जवळपास सारखीच आहे. जगातील एकमेव हिंदू देश अशी नेपाळची ओळख आहे. भारतातही बहुसंख्य हिंदुधर्मीय लोक असून भारताचा सर्वाधिक विश्वासार्ह देश अशी नेपाळची ओळख आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नेपाळशी आपले मैत्रीचे आणि सौहार्दाचे संबंध राहिले आहेत. भारत आणि नेपाळ यांच्या दरम्यानची सीमारेषाही आपण मुक्त केली आहे म्हणजे नेपाळमधील कोणताही नागरिक व्हिसा शिवाय भारतात प्रवेश करू शकतो तसेच भारतात व्यवसायही करू शकतो.

नेपाळचे लाखो नागरिक आज भारतात वास्तव्य करून आहेत. दोन्ही देशात रोटीबेटीचा व्यवहार देखील होतो असे असले तरी तरी गेल्या काही वर्षात नेपाळ आणि भारतात प्रचंड कटुता निर्माण झाली आहे. दोन्ही देशातील सौहार्दपूर्ण संबंध बिघडले आहेत. एकेकाळी भारताला सच्चा मित्र मानणारा नेपाळ आता भारताला स्पर्धक समजू लागला आहे. इतकेच नाही तर भारताचा भूभाग आपल्या नकाशात दाखवून भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान देऊ लागला आहे. के पी ओली शर्मा नावाचे गृहस्थ जेंव्हा नेपाळचे पंतप्रधान बनले तेव्हापासून दोन्ही देशातील कटुता वाढत गेली. के पी ओली शर्मा हे नेपाळचे पंतप्रधान बनल्यावर त्यांनी भारताशी असलेले सौहार्दाचे संबंध तोडून टाकले आणि भारताला आपला प्रतिस्पर्धी म्हणून घोषित केले अर्थात याला चीन जबाबदार आहे.

के पी ओली शर्मा चीन धार्जिणे होते. चीनच्या नादी लागून त्यांनी भारताच्या सतत खोड्या काढण्याचा उद्योग केला. कधी त्यांनी भारताचा भूभाग नेपाळच्या नकाशात दाखवला तर कधी नेपाळच्या चलनी नोटांवर भारताचा भूभाग छापून भारताला चिथावले. अर्थात हा सर्व चीनच्या रणनीतीचा भाग होता. भारताच्या शेजारी असलेल्या देशांना साम, दाम, दंड, भेद या मार्गाचा वापर करून भारताविरुद्ध फितवायचे आणि स्वतःकडे वळवायचे आणि त्याद्वारे भारतावर दबाव आणायचा ही रणनीती होती अर्थात आजही ती आहे याच रणनितीला के पी ओली शर्मा हे बळी पडले आणि त्यांनी भारताला थेट आव्हान दिले त्यामुळे दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. आता मात्र चित्र बदलत आहे कारण चीन धार्जिणे के पी ओली शर्मा यांच्या भ्रष्ट कारभाराविरोधात नेपाळच्या जेन झी ने मागील वर्षी मोठा उठाव केला त्यात के पी ओली शर्मा यांना आपली खुर्ची सोडावी लागली.

के पी ओली शर्मा पदभ्रष्ट झाल्यानंतर नेपाळमध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकीत ३५ वर्षाच्या बालेंद्र शहा उर्फ बालेन या तरुणाच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने (आरएसपी) बहुमत मिळवले आणि त्यांच्या पक्षाने बालेंद्र शहा यांची नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून घोषणा केली. राम नवमीच्या मुहूर्तावर बालेंद्र शहा यांनी नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. बालेंद्र शहा यांनी नेपाळची सूत्रे हाती घेतल्यामुळे भारत आणि यांच्यातील संबंध पूर्वीप्रमाणे सौहार्दाचे होतील अशी आशा निर्माण झाली आहे कारण पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतल्या पासून त्यांनी भारताविरुद्ध एकही वक्तव्य केले नाही अर्थात काठमांडूचे महापौर असताना त्यांनी भारत विरोधी भूमिका घेत ग्रेटर नेपाळचे समर्थन करत भारताला दुखावले होते आता मात्र त्यांची ती भूमिका बदलेल अशी आशा करायला हरकत नाही, कारण बालेंद्र शहा पंतप्रधान बनल्यावर आपल्या पतप्रधानांनी त्यांचे अभिनंदन केले त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत दोन्ही देशात मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी ग्वाही दिली. अर्थात त्यांच्याकडून तशी अपेक्षा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा आणि आपले खूप जवळचे संबंध आहेत.

बालेंद्र शहा यांचे शिक्षण भारतातच झाले आहे. त्यांनी बंगळुरूच्या विश्वेशरय्या युनिव्हर्सिटीमधून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले आहे. त्यांची एक बहीण बंगळुरूमध्येच राहते त्यामुळे भारताबाबत त्यांच्या मनात निश्चितच आदर असेल. अर्थात त्यांच्या मनात चीनबद्दल असलेले आकर्षण लपून राहिले नाही असे असले तरी पंतप्रधान म्हणून ते चीनच्या कच्छपी लागणार नाहीत अशी आशा करूया. भारतानेही याबाबत कुटनितीक पावले टाकून बालेंद्र शहा यांना भारताकडे वळवण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लवकरात लवकर नेपाळचा दौरा करून बालेंद्र शहा यांची भेट घ्यावी त्यामुळे दोन्ही देशात बिघडलेले संबंध पूर्ववत होतील आणि दोन्ही देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील.

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# नगरपंचायत नको, ग्रामपंचायतच करा, अर्धापूरच्या शेतकऱ्यांची आ. श्रीजया चव्हाण यांच्याकडे मागणी



**अर्धापूर (प्रतिनिधी)** –शहराचा नगरपंचायत क्षेत्रात समावेश झाल्यामुळे ग्रामीण भागातील लाभधारकांना हक्काच्या योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. अर्धापूर शिवारातील शेतकऱ्यांनी आता नगरपंचायत रद्द करून पुन्हा ग्रामपंचायत स्थापन करा, अशी मागणी लावून धरली आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने आमदार श्रीजया अशोकराव चव्हाण यांची भेट घेऊन त्यांना मागणीचे निवेदन दिले आहे.

अर्धापूर शहराच्या हद्दीतील १८७० शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नगरपंचायत अस्तित्त्वात आल्यापासून ग्रामीण भागासाठी असलेल्या अनेक महत्त्वपूर्ण शासकीय योजना बंद झाल्या आहेत. विशेषतः रोजगार हमी योजनेअंतर्गत मिळणारे लाभ नगरपंचायत क्षेत्रात मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. यामध्ये सिंचन विहिरी, शेततळे, फळबाग लागवड, जनावरांसाठी गोठे, कांदा चाळ उभारणी यासह विविध योजनांचा लाभ मिळत नाही. आमचे क्षेत्र भौगोलिकदृष्ट्या पूर्णपणे ग्रामीण स्वरूपाचे आहे, मात्र कागदोपत्री नागरी भागात समावेश झाल्यामुळे आम्हाला ना शहराच्या सुविधा मिळत आहेत ना गावाच्या सवलती अशी व्यथा शेतकऱ्यांनी मांडली.

अर्धापूर शहरातील शेतकऱ्यांनी मागणी केली आहे की, शासनाने अर्धापूर नगरपंचायत रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव त्वरित मंजूर करावा आणि पुन्हा ग्रामपंचायत व्यवस्था लागू करावी, जेणेकरून शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू शकेल.

यावेळी शेतकरी ज्ञानेश्वर माटे, साईनाथ लंगडे, विश्वनाथ राऊत, बालाजी माटे, राजेश जाधव, कैलास जाधव, अमोल देशमुख, गणेश गोरे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते. या निवेदनावर शासन व लोकप्रतिनिधी काय भूमिका घेतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांच्या या मागणीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास या महत्त्वाच्या मुद्द्यावर तीव्र आंदोलन करून मागणी पदरात पाडून घेण्याचा निर्धार अर्धापूर शहरातील संतप्त नागरिकांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.


## बिल्लोरी (कि) जिल्हा परिषद शाळेबाबत आग लागल्याची अफवा; शाळा पूर्णपणे सुरक्षित

**नांदेड (प्रतिनिधी)** –किनवट तालुक्यातील बिल्लोरी (कि) येथील जिल्हा परिषद शाळेला आग लागल्याचा एक व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मात्र, या संदर्भातील माहिती पूर्णपणे चुकीची असून, शाळेला कसलीही आग लागलेली नाही व शाळेचे कोणतेही नुकसान झाले नाही.

बिल्लोरी (कि) येथील जिल्हा परिषद शाळा परिसरात किनवट नगरपालिकेच्या वतीने उद्यान उभारणीचे काम सुरू आहे. या कामादरम्यान परिसरातील झाडे-झुडपे तोडून स्वच्छता करण्यात आली होती. दिनांक ६ एप्रिल रोजी रात्री अज्ञात व्यक्तीकडून एकत्रित करण्यात आलेल्या कचऱ्यास आग लावण्यात आली. या आगीचा भडका मोठा दिसत असला तरी त्याचा शाळेशी कोणताही संबंध नव्हता.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. या घटनेत शाळेला कोणतीही हानी पोहोचलेली नाही व शाळा पूर्णपणे सुरक्षित असल्याची माहिती गट शिक्षणाधिकारी महामुने यांनी दिली. तसेच, नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये व अप्रमाणित संदेश पुढे पाठवू नयेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री रेणुका माता मंदिर परिसरात दररोज १००० सुवासिनींना साडी-चोळीचे वाटप



**माहूर (प्रतिनिधी)**– माहूरगड येथे चैत्र महिन्यानिमित्त धार्मिक वातावरणात विश्वशांती व जगाच्या कल्याणासाठी अयुतचंडी महायागाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर महायाग माहूरगड येथील मातृतीर्थ रोडवरील बालाजी मंगल कार्यालय येथे उत्साहात धार्मिक वातावरणात पार पडत आहे. यानिमित्त श्री रेणुका माता मंदिर परिसरात सुवासिनींना दररोज एक हजार साडी-चोळी ओटीच्या साहित्याचे वाटप होत आहे.

सद्गुरू सखाराम महाराज शंकराचार्य संकेश्वर पीठाधीश्वर यांच्या कृपाशीर्वादाने या महायागाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ४ एप्रिल २०२६ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ८ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत हा महायाग सुरू आहे. या महायागामध्ये श्री जगद्जननी रेणुका माता यांच्या सेवेसाठी नवकुंडात्मक अयुतचंडी याग केला जात असून, दररोज चंडीपाठाचे एक हजार अशा एकूण दहा हजार पाठांचे पठण करण्यात येत आहे. २५१ ब्रह्मवृंदाच्या उपस्थितीत दशसहस्त्र पाठांतरानंतर सहस्त्र पाठांचे पठण व २१ ब्रह्मावृंदांच्या उपस्थितीत हवन होत असून महाआरतीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

महायागाच्या यशस्वी आयोजनासाठी टिटवाळा मुंबई येथील शाम जोशी हे नियोजनाची जबाबदारी सांभाळत असून ब्रह्मवृंद व्यवस्थापनाची जबाबदारी श्रीरामपूर येथील हरीश पैठणे गुरुजी पार पाडत आहेत. तसेच ग्रामाचार्य म्हणून रवींद्र कान्नव गुरुजी यांचेही मोलाचे सहकार्य लाभत आहे.

या धार्मिक सोहळ्यात सहस्रार्चन, कुंकू मार्चन, पुष्पअर्चन, फलाअर्चन, द्रव्याअर्चन, धनअर्चन, हवन, तर्पण, मार्जन, ब्राह्मणभोजन तसेच नामसंकीर्तन व गायन-वादन सेवा यांचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या चतुर्वेदांचे पारायण महाराष्ट्रासह विविध राज्यांतून आलेल्या विद्वान वेदपाठी ब्राह्मणांच्या उपस्थितीत सुरू आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महापौर कविता मुळे यांच्याकडून पुतळा परिसराची पाहणी



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या महापौर कविता मुळे यांनी मंगळवारी शहराच्या रेल्वे स्थानकासमोर असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले व तयारीचा आढावा घेतला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अभिवादनासाठी शहरात येणाऱ्या भीम अनुयायांना कोणतीही अडचण येऊ नये, या दृष्टीने त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी महापौर कविता मुळे यांनी पुतळा परिसरातील विद्युत रोषणाई आणि सुशोभीकरणाची बारकाईने पाहणी केली. कडक उन्हाळा लक्षात घेता ठिकठिकाणी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि फिरत्या शौचालयांची उपलब्धता ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्याचप्रमाणे जयंतीच्या मिरवणूक मार्गावर स्वच्छता राखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय साधण्याचे महापौरांनी स्पष्ट केले.

डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला शिस्तीत आणि सुरक्षितपणे डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करता यावे, यासाठी महापौरांनी पालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करून नियोजनाचा आढावा घेतला.

यावेळी महापौरांनी सांगितले की, नांदेड शहरात महामानवाच्या जयंतीचा मोठा उत्साह आहे. महानगरपालिका प्रशासनातर्फे बाबासाहेबांच्या अनुयायांच्या सोयीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. पुतळा परिसरात स्वच्छतेसह सर्व मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्यात आले असून, नागरिकांनी बाबासाहेबांची जयंती शांततेत आणि शिस्तीने साजरी करावी. या पाहणी दौऱ्यात महापौरांसोबत नगरसेवक दयानंद वाघमारे, नगरसेवक प्रतिनिधी संघरत्न कांबळे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, क्षेत्रिय अधिकारी गौतम कवडे, उद्यान विभागाचे गिरीश काठीकर, कनिष्ठ अभियंता ठाणेदार यांच्यासह पालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगीतकार दशरथ पुजारी यांच्या अजरामर गीतांची मैफल सावळ्या विठ्ठला

## सांस्कृतिक कार्य विभागाची सांगीतिक मानवंदना



**नांदेड (प्रतिनिधी)** –ज्येष्ठ संगीतकार दशरथ पुजारी यांच्या अजरामर गीतांची मैफल सावळ्या विठ्ठला हा सांगीतिक कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता कुसुम सभागृह, व्ही. आय.पी. रोड, नांदेड येथे संपन्न होणार आहे.

संगीतकार दशरथ पुजारी हे मागच्या पिढीमधील नामवंत संगीतकार आहेत. त्यांची सांगीतिक कारकीर्द खूप मोठी आहे. केशवा माधवा, देव माझा विठू सावळा, या लाडक्या मुलांनो, झिमझिम झरती श्रावण धारा, अजून त्या झुडुपांच्या मागे अशी अनेक गाणी रसिकांच्या मनावर आजही अधिराज्य करत आहेत. त्यांच्या संगीतातील भक्तीविचारांनी महाराष्ट्रातील वारी परंपरा, संत साहित्य आणि समाजातील ऐक्यभाव अधिक दृढ केला आहे. त्याचबरोबर भावसंगीतही त्यांनी एका उंचीवर नेवून ठेवले आहे. त्यांच्या सांगीतिक कार्याचा आढावा आणि गाणी असा कार्यक्रम आयोजित केला आहे.

या कार्यक्रमाची निर्मिती व संकल्पना संगीतकार आनंदीविकास यांची असून सागर जाधव, शेफाली कुलकर्णी, वर्षा जोशी हे गायक कलावंत सहभागी असणार आहेत. विकास देशमुख, विवेक कयाळ, विश्वेश्वर कोलंबीकर, पंकज शिरभाते, भगवानराव देशमुख, श्रीनिवास लंकावाड, शेख नईम, शेख इस्माईल हे वादक कलावंत सहभागी आहेत तर संवादक म्हणून पद्माकर कुलकर्णी असणार आहेत. आजच्या पिढीसाठी जुन्या संगीताचा प्रेरणादायी ठरणारा हा कार्यक्रम आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

नांदेड व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, संगीत, साहित्यासह सर्वच रसिकांनी या विशेष कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांगीतिक मैफिलीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी केले आहे.

# नांदेड पोलिसांच्या मदतीने निजामबाद पोलिसांची धर्माबादमध्ये कारवाई; क्रिकेट सट्ट्यातील फरार आरोपीला केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –निजामबाद (तेलंगणा) पोलीस ठाण्यात क्रिकेट सट्ट्याची बुक्की चालविणारा धर्माबाद येथील मनोज मानधनी याच्यावर गुन्हा दाखल होता. तेव्हापासून तो मागील एक वर्षापासून फरार होता. धर्माबाद पोलिसांच्या मदतीने निजामबाद पोलिसांनी त्याला अखेर अटक केली.

धर्माबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांना निझामाबाद येथील क्रिकेट सट्ट्याच्या गुन्ह्यांतील मागील एक वर्षापासून फरार असलेला आरोपी मनोज ओमप्रकाश मानधनी हा धर्माबाद येथे आल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने भडीकर यांनी निझामाबाद येथील उत्तर ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधून आरोपी धर्माबाद येथे आल्याबाबत माहिती दिली. यावरुन पोलीस उपनिरीक्षक मिल्कुरी गंगाधर व त्यांचे पथक धर्माबाद येथे आले व त्यांनी पोलीस मदत मिळण्याकरिता पो. नि. भडीकर यांना लेखी पत्रक देऊन विनंती केल्याने योग्य पोलीस मदत पुरवून धर्माबाद व निझामाबाद पोलीस यांनी संयुक्त कारवाई करुन फरार असलेला मनोज मानधनी रा. धर्माबाद याचे राहते घरी जावून शोध घेतला असता तो घरी हजर होता, परंतु आरोपीने घराचा दरवाजा आतमधून लावून घेतल्याने व तो दरवाजा उघडत नसल्याने जवळपास ६ तासांचे प्रयत्नानंतर आरोपीचे घराचा दरवाजा तोडून पोलिसांनी घरात प्रवेश करुन आरोपी मनोज मानधनी यास त्याचे राहते घरातून शिताफीने ताब्यात घेतले आणि अखेर निझामाबाद पोलिसांचे स्वाधीन केले. ही कारवाई करणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.

# प्रशासनाच्या आश्वासनानंतर गोकुंद्यातील महिलांचे उपोषण स्थगित



**किनवट (प्रतिनिधी)**– तालुक्यातील गोकुंदा ग्राम-पंचायतीच्या वार्ड क्रमांक ५ या लोकवस्तीतील छत्रपती संभाजी महाराज वस्तीसमोरील रस्ता व नालीचे बांधकाम त्वरित करून द्यावे, या व अन्य मागण्यांसाठी राखी राजू राठोड, शोभा बिभीषण सानप, सविता संतोष आडे यांच्यासह अन्य महिला व पुरुषांनी सोमवार दि. ६ एप्रिलपासून गोकुंदा ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. सरपंच व प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

गोकुंदा ग्रामपंचायतीच्या वार्ड क्रमांक ५ येथील वस्तीमध्ये अनेक वर्षांपासून कच्चा रस्ता आहे. पावसाळ्यात हा रस्ता पूर्णपणे चिखलमय होतो. या रस्त्यावरून पायीसुद्धा चालणे कठीण आहे. पावसाळ्यात या वस्तीतील वयोवृद्ध नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. वस्तीमध्ये अंगणवाडी शाळा तसेच छत्रपती संभाजी महाराज मुलांचे वसतिगृह आहे. यामुळे जून ते ऑक्टोबर या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शाळकरी मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. वारंवार यासंदर्भात लेखी निवेदन देवूनही या समस्या सोडविण्यात ग्रामपंचायत टाळाटाळ करत असल्याच्या आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षाला कंटाळून महिला व नागरिकांनी सोमवारपासून उपोषण सुरू केले होते. रस्ता व नालीचा प्रश्न महिनाभराच्या आत सोडवू, असे लेखी आश्वासन ग्रामपंचायत व प्रशासनाने दिल्यानंतर महिलांनी आपले उपोषण तुर्तास स्थगित केले आहे.

# पीपल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे डॉ. होमी बाबा बाल वैज्ञानिक स्पर्धेत देदीप्यमान यश



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील पीपल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी डॉ. होमी बाबा बाल वैज्ञानिक स्पर्धेत देदीप्यमान यश संपादन करून नावलौकिक मिळविला आहे.

नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स हायस्कूल येथील इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनी मुंबई येथील यशवंत नाट्यगृह माटुंगा येथे संपन्न झालेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेमध्ये श्रेयस गांगुर्डे याने गोल्ड, प्रथमेश गित्ते याने सिल्वर आणि वैष्णवी पाकलवाड हीने ब्रान्झ मेडल मिळवून यशस्वी झाल्याबद्दल या यशस्वी विद्यार्थ्यांचे नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, सचिव प्रा. शामलताई पत्की, सहसचिव अग्रवाल, शालेय समिती अध्यक्ष स. नौनिहालसिंघ जागीरदार, प्रदीप नागापूरकर, शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, पर्यवेक्षिका राजश्री भालेराव, यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवन राम यांची जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वतंत्र भारताचे माजी उपपंतप्रधान तथा केंद्रीय मंत्री बाबू जगजीवन राम यांची जयंती बळीरामपूर ता. जि. नांदेड येथील श्री संत रोहिदास महाराज मंदिर तीर्थक्षेत्र वर्ग ब येथे येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन तीर्थक्षेत्राचे संस्थापक सचिव वामनराव मे. विष्णुपुरीकर यांनी केले होते.

सर्वप्रथम माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवन राम यांच्या पुतळ्यास माजी सरपंच तथा सदस्य नागोराव आंबटवार व माजी उपसरपंच संभाजी जाधव पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी बाबू जगजीवन राम यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारी भाषणे केली.

या कार्यक्रमास नागोराव आंबटवार, संभाजी जाधव पाटील, वामनराव मे. विष्णुपुरीकर, पत्रकार डी. गा. पाटील, अशोक लाठकर, गुंडप्पा बसलिंगप्पा बारोळे, विठ्ठलराव तिखे, रघुनाथ वाघमारे, प्रा. व्यंकटराव वाघमारे, विठ्ठलराव गोडबोले, शिवाजी वाघमारे, बालाजी अंबुलगेकर, पवन पवार, अनिरुद्ध पवार, स्वराज आंबटवार, साईनाथ चांदणे, विपुल गोडबोले, युवराज गोडबोले, गंगाबाई वाघमारे, तुळसाबाई लाठकर, सागराबाई वाघमारे, अमित गोरे, सुमित गोरे यांच्यासह गावातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## आंबेगाव सोसायटीच्या बैठकीत मध्यवर्ती बँकेच्या मतदानासाठी बालासाहेब मुसळे यांची निवड

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील आंबेगाव सेवा सहकारी सोसायटीच्या मध्यवर्ती बँकेच्या मतदानासाठी बालासाहेब मुसळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे, अशी माहिती भाजपाचे गोविंदराव मुसळे यांनी दिली आहे.

आंबेगाव सेवा सहकारी सोसायटीच्या सर्व संचालक मंडळांची बैठक सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी चेअरमन आनंदराव पाटील मुसळे, व्हाईसचेअरमन उत्तमराव कल्याणकर, संचालक बालासाहेब देशमुख, शिवानंद पाटील शिपरकर, रावसाहेब मुसळे, भाऊराव भोकरकर, पांडुरंग जोंधळे, श्रीमती कलावतीबाई भोकरकर यांच्या उपस्थितीत बालासाहेब मुसळे यांचा एकमेव अर्ज आल्याने मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार बाळासाहेब मुसळे यांना देण्यात आल्याचे जाहीर होताच गोविंदराव पाटील मुसळे, दीपक पाटील शिपरकर, बाबाराव पाटील मुसळे, शिवाजीराव मुदखेडे, साहेबराव जोंधळे, मारोतराव पाटील शिपरकर,खंडेराव कासेवाड आदींनी सत्कार करून जल्लोषात निवडीचे स्वागत केले आहे.

# आज दुसऱ्या विशेष डिजिटल शेती शाळेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अभियान स्वरूपात राबविण्यात येणाऱ्या 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान बाबत कृषी विभाग व पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने एप्रिल २०२६ मध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळा घेण्यात येणार आहेत. यामध्ये पहिली डिजिटल शेतीशाळा १ एप्रिल रोजी संपन्न झाली असून. दुसरी डिजिटल शेतीशाळा बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी आयोजित केली आहे. या डिजिटल शेती शाळांमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा. तसेच प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी डिजिटल शेतीशाळेसाठी आपल्या घरातून ऑनलाईन उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

पाणी फाउंडेशनद्वारा संचालित डिजिटल शेती शाळा हे एक ऑनलाईन व्यासपीठ आहे. जिथे तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त आणि पीकनिहाय उत्तम पद्धतींचे मार्गदर्शन झूम आणि युट्युबच्या माध्यमातून दिले जाते.

दि. १ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या डिजिटल शेतीशाळेच्या पहिल्या सत्रात शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आता पुढील सत्र भाग २ मध्ये जैविक/नैसर्गिक निविष्ठा उत्पादन- बीजामृत, जीवामृत, घन जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क उत्पादन बाबत नियोजित बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ रोजी मार्गदर्शन मिळणार आहे. या सत्रात शेतकऱ्यांना घरच्या घरी विविध उपयुक्त निविष्ठा तयार करण्याचे प्रगत तंत्रज्ञान शिकायला मिळेल जसे की, बिजामृत, जिवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क. तसेच या निविष्ठांचे फायदे आणि त्यांचा योग्य वापर कसा करावा याबाबत सखोल मार्गदर्शन दिले जाईल.

तरी शेतकरी बंधू-भगिनी, शेतकरी गट, FPOs आणि महिला बचत गटांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी आपल्या सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

या शेतीशाळेस कृषी विभाग अंतर्गत उप कृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, समूह सहायक, कृषीताई व कृषी सखी तसेच पशुसंवर्धन विभाग अंतर्गत पशुसंवर्धन विकास अधिकारी, पशुसंवर्धन पर्यवेक्षक व पशुसखी हे उपस्थित राहतील. तसेच प्रत्येक गावात एका मध्यवर्ती ठिकाणी शेतकरी एकत्रित उपस्थित राहतील, असे नियोजित आहे.

शेती शाळा नियोजित दिवशी सायंकाळी ७.३० वाजता सुरू करण्यात येणार आहेत, असे कळविण्यात आले आहे.

## दत्ता कारले यांना पार्डी (वै.) सेवा सहकारी सोसायटीच्या मतदानाचा अधिकार

**मुदखेड (प्रतिनिधी)**– मुदखेड तालुक्यातील मौजे पार्डी वैजापूर सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक निवडणुकीचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. यावेळी सभासद दत्ता चंपतराव कारले यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

यावेळी उपस्थित चेअरमन चक्रधर शामराव पवार, व्हाईस चेअरमन अनिता बाबुराव हंबर्डे, संचालक भीमराव पुंजाजी पवार, बाबुराव गंगाराम पवार, जांबूवंतराव पवार, कैलाश कारले, विठ्ठल धमशेडवार, कोंड्याबाई पवार, राहुल हौसरे शामराव वाघमारे, शंकरराव पवार, सेक्रेटरी भातनासे यांची उपस्थिती होती.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# शाकाहारी लोकांच्या शरीरावर मांस आणणारा घरगुती उपाय

## सत्तू खाण्याचे 5 मार्ग जाणून घ्या...



**आजकाल परदेशी सुपरफूड्स आणि प्रोटीन सप्लिमेंट्सची खूप क्रेझ आहे. लोक ॲव्होकॅडो आणि क्विनोआसारख्या विदेशी पदार्थांच्या मागे धावत आहेत. पण सत्तू हा प्रथिनांचा हा वनस्पती आधारित स्रोत शाकाहारी लोकांना स्नायू वाढवण्यासाठी मदत करतो. ते भाजलेल्या चण्यांपासून बनवले जाते. ज्यामुळे आहारात अनेक महत्त्वाची आणि आवश्यक पोषक तत्वे मिळतात.**

### आधुनिक जगातही सत्तूचे पोषण का महत्त्वाचे आहे?

सत्तू हा एक अत्यंत पौष्टिक पदार्थ आहे. त्यात वनस्पतीजन्य प्रथिनांचे प्रमाण जास्त असते, जे शाकाहारी लोकांसाठी स्नायू वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यातील उच्च फायबरचे प्रमाण पचनक्रिया सुधारते आणि तुम्हाला जास्त वेळ पोट भरल्यासारखे वाटते. ज्यामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यात लोह, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांसारखी आवश्यक खनिजे आणि कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स असतात, जे दीर्घकाळ टिकणारी ऊर्जा प्रदान करण्यास मदत करतात. इतक्या पोषक तत्वांची उपस्थिती आणि संतुलन शरीराचे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करते. यामुळे तुमची ऊर्जा आणि रक्तातील साखरेची पातळी राखण्यास मदत होते. सत्तू तुमच्या चयापचय क्रियेसाठी (मेटाबॉलिझम) रिफाइंड पिठापेक्षा चांगला आहे आणि त्यामुळे रक्तातील ग्लुकोजमध्ये अचानक वाढ होत नाही.

### तुमच्या आहारात सत्तूचा समावेश करण्याचे 5 मार्ग

- सत्तूचा तुमच्या आहारात अनेक प्रकारे समावेश केला जाऊ शकतो, ज्यामुळे तो आधुनिक आणि पारंपरिक अशा दोन्ही प्रकारच्या आहारांसाठी एक उत्तम पर्याय ठरतो.
- खारट सत्तू पेय : २-३ चमचे सत्तू थंड पाण्यात मिसळा. त्यात भाजलेल्या जिऱ्याची पूड, काळे मीठ, लिंबाचा रस आणि ताजी कोथिंबीर घाला. हे पेय शरीराला हायड्रेट करण्यास आणि कमी झालेल्या क्षारांची भरपाई करण्यास मदत करेल.
- गोड सत्तू पेय : सत्तू पाण्यात किंवा दुधात मिसळा. त्यात गूळ आणि वेलची पूड घालून प्या. यामुळे नैसर्गिक ऊर्जा मिळेल.
- सत्तू पराठा : सत्तूमध्ये मसाले, कांदा आणि काही औषधी वनस्पती मिसळून गव्हाच्या पिठाच्या पराठ्यांमध्ये सारण म्हणून वापरा.
- सत्तूची लापशी : हा एक झटपट, आरोग्यदायी नाश्ता आहे. तुम्ही सत्तू कोमट पाण्यात किंवा दुधात मिसळू शकता.
- सत्तू लाडू : याचा उपयोग आरोग्यदायी नाश्ता आणि गोड पदार्थ म्हणून केला जाऊ शकतो. हे बनवण्यासाठी, सत्तू तूप आणि गुळात मिसळून त्याचे लाडू बनवा.

### सत्तू खाण्याचे फायदे

आजच्या जगात, अनियमित खाण्याच्या सवयी, प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन आणि पचनाच्या समस्या खूप सामान्य झाल्या आहेत. सत्तूचे सेवन केल्याने या समस्यांपासून आराम मिळतो. त्यातील फायबर आतड्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरते आणि त्यातील प्रथिने स्नायू टिकवून ठेवण्यास मदत करतात. उन्हाळ्यात ते शरीराला थंडावा देते. शिवाय, त्याचे सेवन करण्यासाठी कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता नसते.

### या गोष्टी लक्षात ठेवा...

सत्तू शरीरासाठी आरोग्यदायी आहे, परंतु त्याचे सेवन प्रमाणातच केले पाहिजे. पुरेसे पाणी न पिता जास्त प्रमाणात सत्तू खाल्ल्यास पोट फुगणे आणि पोटाचे विकार होऊ शकतात. तुम्ही नेहमी हायड्रेटेड (शरीरात पुरेसे पाणी) राहाल याची खात्री करा. ज्या लोकांना किडनीचा आजार आहे किंवा जे प्रथिने-नियंत्रित आहार घेत आहेत, त्यांनी नियमितपणे सत्तूचे सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### सत्तू किती प्रमाणात योग्य आहे?

बहुतेक प्रौढांसाठी, दररोज २ ते ३ मोठे चमचे सत्तू पुरेसे आहे. तुम्ही नाश्ता आणि दुपारच्या जेवणाच्या मध्ये पेय म्हणून, हलके जेवण म्हणून किंवा व्यायामानंतर वनस्पती-आधारित प्रथिनांचा आधार म्हणून त्याचे सेवन करू शकता. सत्तू हे दाखवून देते की पारंपरिक आहार आजच्या आधुनिक पौष्टिक गरजांमध्ये बसू शकतो. हे एक स्वस्त, सहज उपलब्ध आणि पोषक तत्वांनी समृद्ध अन्न आहे, ज्यामुळे ते तुमच्या रोजच्या आहारात एक अत्यंत आरोग्यदायी भर ठरते.



# जाड, भीतीदायक चेहरा असलेली अँकर...

## ऑप्टिक न्यूरायटिसमुळे मेघाला ऐकाव्या लागल्या अपमानास्पद प्रतिक्रिया... हा आजार नेमका काय आहे?

**आजार केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिकदृष्ट्याही त्रासदायक ठरू शकतात. ऑप्टिक न्यूरायटिससारख्या स्वयंप्रतिरोधक (ऑटोइम्यून) आजाराची लक्षणे, उपचार आणि अनुभव या गोष्टी तर आयुष्यभर लक्षात राहतील अशा असतात. एका राष्ट्रीय वृत्तपत्राच्या आरोग्यविषयक पॉडकास्टच्या निवेदिका मेघा कुमारी यांनी या आजाराच्या सुरुवातीपासून ते पूर्णपणे बऱ्या होईपर्यंतचा आपला धक्कादायक अनुभव सांगितला आहे...**

गैरहजर राहण्याआधी माझ्या अनुपस्थितीचा ऑफिसच्या कामावर परिणाम होऊ नये, यासाठी मी आधीच व्हिडीओ तयार करत होते. परिणामी, स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवणे अपरिहार्य होते. त्यामुळे थकव्याचे लक्षण आहे, असे समजून मी डोळ्यांच्या वेदना आणि काळ्या डागांकडे दुर्लक्ष केले. पण अचानक, डोळ्यांतील काळे ठिपके (फ्लोटर्स) वाढू लागले आणि वेदनेमुळे डोळ्यांची बाहुली हलवणेही कठीण झाले. एकदा, मी सहजपणे माझा डावा डोळा मिटून उजव्या डोळ्याने पाहिले. तरंगणारे काळे ठिपके, जाळी आणि रेषा यांची संख्या पाहून मला धक्काच बसला. तेव्हाच मी ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे ठरवले...

### पहिल्यांदा ऐकलं आजाराचं नाव...

**1** हॉस्पिटलमध्ये माझी कहाणी ऐकल्यानंतर नेत्र डॉक्टरांनी डोळ्यांची तपासणी केली आणि लगेच काही चाचण्या करायला सांगितल्या. चाचणी अहवाल तपासताना डॉक्टरांचे भाव सतत बदलत होते. अहवाल तपासल्यानंतर मी डॉक्टरांना 'ऑप्टिक न्यूरायटिस हा शब्द उच्चारताना पहिल्यांदाच ऐकलं, ही गोष्ट आजही ऐकल्यावर किंवा वाचल्यावर माझ्या अंगावर काटा येतो. डॉक्टर मला म्हणाले, 'ऑप्टिक न्यूरायटिस हा एक ऑटोइम्यून आजार आहे आणि त्यावर न्यूरोलॉजिस्ट उपचार करतात, नेत्र डॉक्टर नाही... हे सगळं ऐकून माझ्या मनात गोंधळ आणि भीती या दोन्ही भावना दाटून आल्या...

### मी कदाचित जगणार नाही असं मला वाटलं...

**2** हॉस्पिटलमधील एका न्यूरोलॉजिस्टशी बोलल्यानंतर, मला ताबडतोब दाखल होण्याचा सल्ला देण्यात आला, नाहीतर माझी दृष्टी कायमची जाऊ शकते, असा इशाराही देण्यात आला. रुग्णालयात माझ्या महत्त्वाच्या शारीरिक क्रिया (हृदयाचे ठोके, रक्तदाब, श्वसन दर, शरीराचे तापमान आदी.) तपासण्यात आल्या आणि त्यानंतर दोन प्रकारचे एमआरआय स्कॅन करण्यात आले. बोलता बोलता डॉक्टरांनी सांगितले की, मल्टिपल स्क्लेरोसिसमुळे देखील ऑप्टिक न्यूरायटिस होऊ शकतो. हे ऐकून मला २००७ सालच्या 'गुरु' या बॉलिवूड चित्रपटाची आठवण झाली, ज्यात विद्या बालनच्या पात्राला मल्टिपल स्क्लेरोसिसचा आजार असतो आणि तिच्याकडे जगण्यासाठी फक्त एक वर्ष उरलेले असते. याचा विचार करून मलाही वाटले की, कदाचित मी सुद्धा जगणार नाही.

### हे माझे दुर्दैव होते का?

**3** एक प्रश्न मला सतत सतावत होता : हे सर्व माझ्यासोबतच का घडले? रुग्णालयात दाखल करताना डॉक्टरांनी मला सांगितले होते की, ८ ते १० वर्षांपूर्वी हा आजार फारसा प्रचलित नव्हता. पण आजकाल याच्या रुग्णांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे आणि याचे कारण शोधण्यासाठी संशोधन सुरू आहे. डॉक्टर म्हणाले, की माझ्या आजारपणाला कोणतेही विशिष्ट कारण नाही. त्याला केवळ बॅड लक मानले जाऊ शकते. अशा स्वयंप्रतिरोधक (ऑटोइम्यून) आजारांमध्ये शारीरिक आणि मानसिक ताण हे अनेकदा एक प्रमुख कारण मानले जाते.

### एमआरआय रिपोर्टमुळे भीती दूर

**4** सुदैवाने एमआरआयमध्ये फक्त ऑप्टिक न्यूरायटिस, म्हणजेच माझ्या उजव्या डोळ्यातील नसेला आलेली सूज, असल्याचे दिसून आले. डॉक्टरांनी ताबडतोब उपचार सुरू केले आणि चार दिवसांसाठी आयव्ही (IV) द्वारे स्टिरॉइड्स घेण्यास सांगितले. यासोबतच, मला गॅस कमी करणाऱ्या गोळ्या, मल्टीव्हिटॅमिन्स आणि व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्ससुद्धा लिहून देण्यात आल्या. मी रुग्णालयात दाखल असताना माझी सीएसएफ (CSF) चाचणी झाली, ज्यामुळे मला माझ्या आयुष्यातील सर्वात असह्य वेदना झाल्या. डॉक्टरांनी सीएसएफ चाचणीनंतर आठवडाभर झोपून राहण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे मला झोपूनच राहावे लागले. मात्र, अडचण अशी होती की चार दिवसांनी माझे विमान होते आणि मी नोएडामध्ये एकटीच राहत होते. त्यामुळे, डॉक्टरांशी बोलल्यानंतर मला घरी जाण्यासाठी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.




### सर्वात वेदनादायक क्षण अनुभवले...

**5** घरी परतल्यानंतर, मला उरलेले आयव्ही स्टिरॉइड्स देण्यात आले, कारण मला वाटले की औषधांचा प्रभाव काही दिवस टिकेल आणि माझी दृष्टी सामान्य होईल. पण अवघ्या दोन दिवसांनंतर मला रात्री अचानक तीव्र डोकेदुखी सुरू झाली, जी वेदनाशामक गोळ्यांनीही कमी होत नव्हती. वेदना वाढतच होत्या आणि जणू काही माझ्या डोक्यातील सर्व रक्तवाहिन्या फुटत आहेत असे वाटत होते. जेव्हा मला काहीच आराम मिळत नव्हता आणि वेदना असह्य झाल्या, तेव्हा मी ताबडतोब माझ्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरला फोन केला आणि त्यांना परिस्थिती समजावून सांगितली. डॉक्टरने एक इंजेक्शन लिहून दिले, जे मी त्याच रात्री माझ्या घराजवळील एका रुग्णालयात घेतले आणि २-३ तासांत मला आराम मिळू लागला. हे २-३ तास माझ्या आयुष्यातील सर्वात वेदनादायक क्षण होते, त्यांची आठवण झाली की आजही माझ्या अंगावर काटा येतो.

### स्टेरॉइडचे दुष्परिणाम दिसू लागले...

**6** स्टेरॉइड औषधांचे काही दुष्परिणाम असतात, जे हळूहळू माझ्या शरीरावरही दिसू लागले. माझा चेहरा सुजू लागला, ज्याला वैद्यकीय भाषेत 'मून फेस' म्हणतात. यासोबतच तीव्र केसगळती सुरू झाली, ज्यामुळे माझ्या टाळूवर काही ठिकाणी स्पष्टपणे टक्कल पडले होते. माझं शरीर असं फुगलं होतं, जणू कोणीतरी त्यात हवा भरली आहे. शिवाय, मला मूड स्विंग्ज, निद्रानाश, चिंता, अस्वस्थता आणि प्रचंड भूक लागण्याचा त्रास होऊ लागला. माझं वजन ५४ किलोग्रॅमवरून ६५ किलोग्रॅम झालं. स्टिरॉइड्सचा एक मनोरंजक दुष्परिणामही दिसून आला. ही औषधं घेत असताना मला विलक्षण ऊर्जा जाणवत होती. सकाळी घरकाम करणं, मग कामासाठी ऑफिसला जाणं आणि संध्याकाळी घरी येऊन जेवण बनवणं ही सर्व कामं अगदी क्षुल्लक वाटत होती. पण उपचार संपल्यावर हा भ्रम दूर झाला आणि तेव्हा माझ्या लक्षात आलं की माझं शरीर किती अशक्त झालं आहे.

### उपचार 4 महिने चालले...

**8** माझे ऑप्टिक न्यूरायटिसवरील उपचार सुमारे ४ महिने चालले. स्टेरॉइडचा डोस ६० मिग्रॅ पासून सुरू झाला, नंतर तो हळूहळू ५ मिग्रॅ पर्यंत कमी करण्यात आला आणि नंतर बंद करण्यात आला. तथापि, काही समस्या कायम राहिल्या. स्टेरॉइड्स आणि इतर औषधे बंद केल्यानंतर, माझ्या चेहऱ्यावर खूप मुरुमे येऊ लागली आणि मला अशक्तपणा व ऊर्जेची कमतरता जाणवू लागली. डॉक्टरांनी सांगितले की या सर्व समस्या काही महिन्यांत पूर्णपणे नाहीशा होतील. डॉक्टरांनी हे देखील स्पष्ट केले की ऑप्टिक न्यूरायटिस हा एक ऑटोइम्यून आजार असल्याने, रोगप्रतिकार प्रणाली स्वतःच्याच शरीरावर हल्ला करते. यामुळे, काही लोकांना त्यांच्या आयुष्यात हा आजार एकापेक्षा जास्त वेळा होऊ शकतो, परंतु हे नेहमीच घडते असे नाही.

### ट्रोलिंग अन् लो कॉन्फिडन्सचा काळ...

**7** माझा व्यवसाय कॅमेऱ्यासमोरचा आहे. त्यामुळे प्रत्येक वेळी स्क्रीनवर दिसताना मला आनंदी, फिट आणि उत्साही दिसणे आवश्यक असते. ऑफिसमध्ये परतल्यानंतर, मी मेकअप आणि कॉन्टूरिंगने चेहऱ्यावरची सूज लपवण्याचा प्रयत्न केला आणि चेहऱ्याचे व्यायामही सुरू केले, पण कशाचाच उपयोग झाला नाही. ऑफिसमधील प्रत्येकजण माझ्याकडे वेगळ्या नजरेने पाहू लागला आणि त्यांच्या डोळ्यांतील प्रश्न मला स्पष्टपणे समजत होते. मी हळूहळू लोकांना भेटणे किंवा फोटो काढणे बंद केले. माझे नवीन कपडे मला घट्ट होऊ लागले आणि या सर्व बदलांमुळे माझा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या कमी झाला होता. एक वेळ अशी होती की मला आरशात स्वतःकडे बघायलाही आवडत नव्हते. लोक माझ्या व्हिडिओंवर मला ट्रोल करू लागले. काहींनी मला जाड म्हणून हिणवले, काहींनी मला कुरूप अँकर म्हटले आणि काहींनी आम्हाला आरोग्याविषयी माहिती देण्यापूर्वी वजन कमी करण्यास सांगितले. मला व्हिडिओ बनवण्याची भीती वाटू लागली. शूटिंगच्या वेळीसुद्धा, मी स्वतःला अधिक चांगले कसे दाखवू शकेन, याचाच मी सतत विचार करत असे. या कठीण काळातून मी एक गोष्ट नक्कीच शिकलो, ती म्हणजे काही आजार तुम्हाला केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिकदृष्ट्याही खचवून टाकतात. अशा आजारांमधून बरे होण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती, सकारात्मकता, सामाजिक आधार आणि मानसिक बळ यांची गरज असते. लोक काय म्हणतात याची चिंता करू नका; आजारावर मात करून निरोगी होणे हे तुमचे ध्येय असले पाहिजे. इतर समस्या हळूहळू आपोआप सुटतात.

### आहारात फक्त एक बदल

डॉक्टरांनी माझ्या आहारात कोणताही बदल केला नाही. मला आरोग्यदायी पदार्थ खाण्याचा आणि खाण्याचे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचा सल्ला देण्यात आला होता. तथापि, डॉक्टरांशी बोलल्यानंतर, मी दररोज सकाळी कच्ची हळद, आवळा, काळी मिरी आणि लिंबाच्या रसाचे मिश्रण पिण्यास सुरुवात केली. डॉक्टरांच्या मते, यामुळे सूज कमी होण्यास मदत होते.

### कठीण काळात कणखर

स्वयंप्रतिरोधक (ऑटोइम्यून) आजारांमध्ये तणाव हे अनेकदा एक प्रमुख कारण असते. त्यामुळे, या आजाराने मला शिकवले आहे की माझ्या तणावाचे व्यवस्थापन करणे किती महत्त्वाचे आहे आणि मानसिक शांती किती आवश्यक आहे. मी आता माझा राग, अनावश्यक विचार आणि भावनांवर नियंत्रण ठेवायला शिकले आहे. मला हे देखील जाणवले आहे की माझे आरोग्य हेच माझे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे.

# सिरोसिसची सुरुवात कशी ओळखावी? लहान-सहान गोष्टींकडे लक्ष द्यायला सुरुवात करा...

**लिव्हर सिरोसिसचे रुग्ण अनेकदा त्यांच्या शरीराचे गंभीर नुकसान झाल्यानंतरच जागे होतात. आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यात, त्यांच्या शरीराची स्थिती खालावत आहे हे त्यांच्या लक्षातही येत नाही. सिरोसिसचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास त्यावर प्रभावीपणे नियंत्रण मिळवता येते. यासाठी, वारंवार येणारा थकवा, अशक्तपणा आणि भूक न लागणे यांसारख्या लहान समस्या ओळखायला सुरुवात करणे आवश्यक आहे.**

- सिरोसिसमुळे यकृतावर नुकसानीची लक्षणे : लिव्हर सिरोसिस ही एक गंभीर आरोग्य समस्या आहे. या स्थितीत, यकृताच्या सामान्य पेशी हळूहळू खराब होतात आणि त्यामुळे डॅमेजचे निशाण दिसतात. वैद्यकीय भाषेत त्याला स्कार टिश्यू म्हणतात. या प्रक्रियेमुळे यकृताची कार्य करण्याची क्षमता हळूहळू कमी होते. सुरुवातीला लक्षणे सौम्य असतात आणि आजार जसजसा वाढत जातो, तसतशी ती अधिक गंभीर होतात. आजार जसजसा वाढत जातो, तसतसे शरीरावर होणारे त्याचे परिणाम स्पष्टपणे दिसू लागतात.
- कोणत्या लहान गोष्टींची जाणीव ठेवावी? : लिव्हर सिरोसिसचे दोन मुख्य टप्पे आहेत. सुरुवातीच्या टप्प्यात, यकृताला नुकसान पोहोचू लागते, परंतु अवयव अजूनही आपली सामान्य कार्ये करण्यास सक्षम असतो. या टप्प्यात, सौम्य थकवा, अशक्तपणा किंवा भूक न लागणे यांसारख्या किरकोळ समस्या आजाराची लक्षणे म्हणून दिसतात. ही लक्षणे अनेकदा सौम्य असतात, ज्यामुळे ती ओळखणे कठीण होते. या किरकोळ समस्या ओळखल्याने सिरोसिसचे लवकर निदान होण्यास मदत होते. दुसरा टप्पा म्हणजे डीकंपन्सेटेड टप्पा, ज्या दरम्यान यकृताची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या कमी होते आणि लक्षणे अधिक गंभीर होतात. रुग्णांना सूज, शरीरात पाणी साठणे (ॲसाइटिस), कावीळ आणि सहज रक्तस्त्राव होण्याचा अनुभव येऊ शकतो. ही स्थिती खूप धोकादायक आहे आणि यासाठी त्वरित वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असते.
- कोणती लक्षणे आढळतात? : लिव्हर सिरोसिसची लक्षणे हळूहळू विकसित होतात आणि कालांतराने अधिक गंभीर होतात. सुरुवातीला, यकृताच्या खराब कार्यामुळे आणि ऊर्जेचा पुरवठा कमी झाल्यामुळे रुग्णांना सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवतो. भूक कमी होते आणि पचनक्रिया बिघडते, ज्यामुळे वजन कमी होते. ॲसाइटिस (पोटात पाणी साठल्यामुळे येणारी सूज) आणि पाय व घोट्यांना सूज देखील येऊ शकते.
- यकृताच्या नुकसानीमुळे रक्त गोठण्याची क्षमता देखील कमी होते, ज्यामुळे जखमांमधून सहज किंवा गंभीर रक्तस्त्राव होतो. काही रुग्णांना त्वचेवर सतत खाज सुटण्याचा अनुभव येतो कारण यकृत विषारी पदार्थ गाळून काढण्यास असमर्थ ठरते. हे विषारी पदार्थ मेंदूवर परिणाम करू शकतात, ज्यामुळे गोंधळ, विस्मरण किंवा वर्तणुकीतील बदल यांसारखी मानसिक लक्षणे दिसू शकतात.
- लिव्हर सिरोसिस शरीराला कसे नुकसान पोहोचवते? : यकृत हा एक महत्त्वाचा अवयव आहे जो विषारी पदार्थ बाहेर टाकणे, पचन आणि पोषक तत्वांच्या चयापचयात सामील असतो. सिरोसिसमुळे या अवयवाची सामान्य रचना आणि कार्य बिघडते. यामुळे शरीरात विषारी पदार्थ जमा होतात आणि रक्तप्रवाहातही अडथळा येऊ शकतो. यामुळे पचनसंस्था कमकुवत होते आणि पोषक तत्वांचा योग्य वापर होण्यास अडथळा येतो. शरीर आणि रोगप्रतिकारशक्ती हळूहळू कमकुवत होतात, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. वेळेवर उपचार न केल्यास, ही स्थिती अखेरीस यकृत निकामी होण्यास कारणीभूत ठरू शकते.
- डॉक्टरांना भेटणे केव्हा महत्त्वाचे ? : लिव्हर सिरोसिसचे लवकर निदान करण्यासाठी, तुम्हाला काही विशिष्ट लक्षणे जाणवल्यास तुम्ही निश्चितपणे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. जर तुम्हाला विश्रांतीनंतरही दीर्घकाळ टिकणारा थकवा, कावीळ, पोट फुगणे किंवा अचानक वजन कमी होणे यांसारखी लक्षणे जाणवत असतील, तर स्वस्थ बसू नका. ही यकृताच्या गंभीर समस्येची चिन्हे असू शकतात.

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ



**मुंबई(प्रतिनिधी)**–जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता–बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

# जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये दिव्यांग कलाकारांसाठी 'विविधतेचा उत्सव'

**मुंबई(प्रतिनिधी)** –कॅन्व्हासवर रंग उमटत होते, पण ते केवळ चित्र नव्हते ते होते स्वप्नांचे प्रतिबिंब. प्रत्येक रेषेत जिद्द, प्रत्येक रंगात आशा आणि प्रत्येक कलाकृतीत स्वतःला सिद्ध करण्याची ताकद दडलेली होती. निमित्त होते सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाइन येथे आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग कलाकारांसाठीच्या विशेष कला कार्यशाळेचे.

मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाइन येथे ६ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान दिव्यांग कलाकारांसाठीच्या विशेष कला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाइन यांच्या सहकार्याने व आयसोवा (खडजथ) आणि राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग सक्षमीकरण संस्था (छखएझखऊ) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत मुंबई आणि परिसरातील विविध संस्थांमधील ४२ दिव्यांग कलाकारांनी उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेत, आपल्या सर्जनशीलतेची झलक सादर केली आहे. या कार्यशाळेत १८ पेक्षा अधिक संस्थां सहभागी झाल्या. या उपक्रमामागे आयसोवाच्या अध्यक्ष मीनाक्षी अग्रवाल यांचा महत्त्वपूर्ण पुढाकार आहे.

या कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे विविधतेतून निर्माण होणारी सर्जनशीलता. ऑटिझम, डाउन सिंड्रोम, बौद्धिक दिव्यांगत्व, श्रवणदोष, अल्पदृष्टी, पॅराप्लेजिया अशा विविध प्रकारच्या दिव्यांगत्वावर मात करत या कलाकारांनी कलेच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. कलाकारांनी सूक्ष्म तपशीलांनी परिपूर्ण चित्रे रेखाटली. प्रत्येकाच्या कलेत त्यांचा स्वतःचा अनोखा दृष्टिकोन दिसून येत होता. त्यांच्या प्रत्येक रेषेत एक प्रयत्न, प्रत्येक रंगात एक जिद्द आणि प्रत्येक चित्रात मीही काहीतरी करू शकतो हा आत्मविश्वास दिसत होता.

दिव्यांग कलाकारांसाठी कलाही एक वेगळीच ओळख निर्माण करते. त्यांच्या आयुष्यातील आव्हाने, संघर्ष आणि अनुभव हे त्यांच्या कलेतून अधिक प्रभावीपणे व्यक्त होतात. जिथे शब्द अपुरे पडतात, तिथे रंग त्यांच्या भावना स्पष्टपणे मांडतात. कधीकधी एक साधे चित्रही त्यांच्या मनातील खोल विचार आणि भावना व्यक्त करून जाते. शारीरिक किंवा बौद्धिक अडचणी असूनही ही मुल कलेच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहेत.

महाराष्ट्र शासन
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर
कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर), नांदेड
जंगमवाडी,नांदेड
दूरध्वनी क्र.02462-260355
E mail:- eempd@rediffmail.com

**ई- निविदा सूचना क्र. 01 सन 2026-27**

कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर), नांदेड जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामासाठी ई-निविदा पध्दतीने निविदा (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे नमुन्यातील ई-निविदा संकेतस्थळ **http//mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर),नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | कंत्राटदारांचा नोंदणीकृत वर्ग | निविदा किंमत रु.लक्ष |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत आसना नदीचे ब्लॉक कंटूर सर्वेक्षणासह महापुर सीमा संगणन आणि जलशास्त्रीय अभ्यास व रेड लाईन व ब्लू लाईनचे सीमांकन करणेबाबत | नांदेड | Open to all Bidders who are Eligible for this work | 63.25 (जी.एस.टी वगळून) |

ई -निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक 08/04/2026 ते दिनांक 15/04/2026
ई -निविदा सादर करणे:- दिनांक 15/04/2026
ई -निविदा उघडणे :- दिनांक 16/04/2026

खालील संकेतस्थळावर ई – निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
1) संकेतस्थळ **http://mahatenders.gov.in** (सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल)
2) कार्यकारी अभियंता,नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर),नांदेड कार्यालयातील सूचना फलकासाठी
3) कंत्राटदाराने BOQ मध्ये भारतीय चलनात दर सादर करणे आवश्यक आहे.

जा.क्र./नांपाविउनां/लेखा-2/ ३२५ /2026
नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर), नांदेड.
दि. ०१ /04/ 2026

कार्यकारी अभियंता,
नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर),नांदेड.

विमाका/लातूर/जा.हि.क्र...०१.../२०२६-२०२७

पान १ वरून...

**नांदेड एज्युकेशनच्या अध्यक्षपदी...**

अग्रवाल यांची संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते निवड केली. याच बैठकीत संस्थेच्या घटनेनुसार अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी सचिवपदी प्रा. शामल दीपनाथ पत्की (कुरुंदकर) यांची तर सहसचिवपदी अ‍ॅड. कॉ. प्रदीप अनंतराव नागापूरकर यांची नियुक्ती करण्यात आली.

दरम्यान, डॉ. काब्दे यांनी अनेक वर्षे अध्यक्ष म्हणून संस्थेची यशस्वी धुरा सांभाळली होती. त्यांच्या कार्यकाळात संस्थेची शैक्षणिक प्रगती लक्षणीय झाली. त्यांच्या राजीनाम्यानंतर आता डॉ. प्रवीण पाटील यांच्या नेतृत्वाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर सीए डॉ. प्रवीण पाटील म्हणाले की, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प. पू. स्वामी रामानंद तीर्थ, पद्मश्री गोविंदभाई श्रॉफ आणि माजी खा. डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी घालून दिलेल्या पायवाटेवरच आगामी काळात सर्वांच्या सहकार्यातून संस्थेचा विकास करण्याचा प्रयत्न केला जाईल. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे हित प्राधान्याने जोपासण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी कार्यकारिणी सदस्य स. नौनिहालसिंघ जहागिरदार, डॉ. उमेश भालेराव, अ‍ॅड. चिरंजीलाल दागडीया, शांभवी साले, प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, प्रभारी प्राचार्य शिवशंकर भानेगावकर, प्रा. एकनाथ खिल्लारे, प्रा.ए.टी.शिंदे, प्रा. यशपाल भिंगे आणि प्रा. विलास वडजे आदी कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

# वांद्रे आणि कुर्ला स्टेशनवरुन बीकेसी दरम्यान पॉड टॅक्सी मार्गिकेच्या कामाचे भूमिपूजन

**मुंबई(प्रतिनिधी)**– वांद्रे कुर्ला संकुलातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी, कुर्ला रेल्वे स्थानक आणि वांद्रे रेल्वे स्थानकावरून बीकेसीत पोहोचणे सोपे व्हावे यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पॉड टॅक्सी प्रकल्प हाती घेतला आहे. वांद्रे रेल्वे स्थानक ते कुर्ला रेल्वे स्थानक व्हाया बीकेसी अशा ८.८ किमीच्या पॉड टॅक्सी मार्गिकेच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आलं.

काम सुरू झाल्यापासून तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करून पॉड टॅक्सी सेवेत दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे बीकेसीमध्ये २०२९ मध्ये पॉड टॅक्सी धावताना दिसणार आहे.

इरपवीर घींश्रर उेाश्रिशु इघउ झेव ढ्रुळ मुंबईतील बीकेसी परिसरात सुरू होणारा पॉड टॅक्सी प्रकल्प वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल घडवणारा असेल. बीकेसीमध्ये दररोज ४ ते ६ लाख लोकांची ये–जा होते. अशात, लास्ट माईल कनेक्टिव्हिटी हा मोठा प्रश्न.

एकूण प्रकल्पाची लांबी ८.८ किमी असून त्यामध्ये ३८ स्थानके असतील. एका पॉड टॅक्सीमध्ये ४ ते ६ प्रवासी प्रवास करु शकणार. प्रत्येक १५ ते ३० सेकंदांनी सेवा उपलब्ध असणार, ज्यात ४० किमी / तास वेगाने पॉड टॅक्सी धावणार.

सुरुवातीला प्रवासी भाडे २१ रुपये प्रति किमी राहण्याची शक्यता. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपद्वारे प्रकल्प पूर्ण केला जाणार. पॉड टॅक्सीनं बीकेसीतील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार.

मुंबईकरांसाठी मंगळवारचा दिवस खास ठरला. कारण राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुंबईतील अनेक विकासकामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन पार पडलं. यापैकीच एक होता दहिसर ते काशीगाव मेट्रो ९ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम. २०१८ साली या प्रकल्पाचं भूमिपूजन झालं होतं. त्यानंतर आज मुंबई आणि मीरा भाईंदरला जोडणाऱ्या मेट्रो ९ प्रकल्पाच्या या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पार पडलं. मेट्रो ७ ला जोडणारी ही मार्गिका लवकरच पूर्ण करू असं आश्वासन यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिलं.

## जाहीर समन्स

माननीय दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बिलोली यांचे न्यायालयात
नियमित दिवाणी दावा क्रमांक १०१/२०२३
अंजली शिवराम भरडे
विरुध्द
नागनाथ पि. गंगाधर कुंठेवाड व ईतर

प्रतिवादी क्रमांक ०६ अश्विनी भ्र. साईनाथ देशमुख (अश्विनी पि. विठ्ठलराव कुंठेवाड) वय - २४ वर्षे, व्यवसाय - शेती, रा. आलूर, ता. धर्माबाद, जि. नांदेड.

सदर जाहीर समन्स व्दारे आपणास कळविण्यात येते की, अंजली शिवराम भरडे वय ४० वर्षे धंदा–शेती रा. तग्याळ ता. / मंडळ बोधन जि. निझामाबाद यांनी या न्यायालयात तुमच्याविरुध्द सदरचे प्रकरण दाखल केले आहे. सदर प्रकरणामध्ये तुम्ही प्रतिवादी क्रमांक ०६ आहात.

तुम्हास ब–याचवेळा या न्यायालयामार्फत समन्स काढले असता आपण बजावून घेत नाहीत व सदर ठिकाणी आढळून येत नाहीत म्हणून वादीच्या वकीलाने तुमच्याविरुध्द जाहिर समन्स काढणे संबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर माननीय न्यायालयाने आपल्या विरुध्द जाहिर समन्स काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हास या जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, तुम्ही दिनांक १५/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता माननीय दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे, अन्यथा तुमच्या विरुध्द या प्रकरणाची एकतर्फी सुनावणी करुन निकाल देण्यात येईल.

आज दिनांक १२/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक,
दिवाणी न्यायालय व. स्तर,
बिलोली.

सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर
बिलोली.

## मूळ कादगपत्रं हरवले

मौजे वाडी बु. नांदेड येथील शेत सर्व्हे नं. १४१ मधील गायरान शेत असून, त्या गायरान शेतीमधून १ गुंठा जमीन माझे वडील बालाजी लोखंडे यांच्या नावे दि. ९/४/२०१३ मध्ये कायमस्वरूपी दान म्हणून विक्री केलेले आहे. सदर दानपत्राचे मूळ कागदपत्र दि. ३१/३/२०२६ रोजी संध्याकाळी ४ वाजता जेतवन नगर ते पावडेवाडी ऑटो प्रवासात हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता–शीलरत्न पि. बालाजी लोखंडे रा. जेतवननगर, तरोडा बु. नांदेड

## Change In Name

My Old Name is **AASMA KHANAM FAHEEM KHAN** which now I am changing as New Name **ASMA KHANAM RAEES KHAN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H. No. 2-5-27 Waghi Road Opp. Water Tank Khadkpura Nanded-431601

## Change In Name

My Old Name is **SHAIKH JARINA NAJIR** which now I am changing as New Name **SHAIKH JARINA YEJAS** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** At Kiroda Post Golegaon P.K, VTC: Kiroda, PO: Loha, Sub District: Loha,District: Nanded, State: Maharashtra, PIN Code: 431708 Mo. 8767435148

## Change In Name

My Old Name is **SAHEBRAO GANPAT INGOLE** which now I am changing as New Name **SAHEBRAO GANPATRAO INGOLE** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - SAHEBRAO GANPATRAO INGOLE** H. No. 468 TATHAGAT Nagar Malegaon Road Taroda Kh, Nanded

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED NAEEM KHAN** which now I am changing as New Name **MOHAMMED NAEEM KHAN MUNWAR KHAN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H. No. 1-12-257 VIMANTAL Road Sahyog Nagar, Nanded-431605
Mo.No. 9766551738

## Change In Name

My Old Name is **ILYAS BEGUM** which now I am changing as New Name **ILYAS BEGUM MOHAMMED NAEEM KHAN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H. No. 1-12-257 AirPort Road Sahyog Nagar, Nanded-431605
Mo.No. 9766551738

## Change In Name

My Old Name is **SHAFIUDDIN MOHAMMAD ISMAIL** which now I am changing as New Name **SHAFIUDDIN MOHD ISMAIL** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H. No. 1-7-25 WorkShop Road Opp.Best Xerox Sahyog Nagar, Taroda Bk. Nanded-431605 Mo.No. 9028978978

## जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा दंडाधिकारी नायगांव खै. यांचे न्यायालयात
प्रकरण :– जन्म / मृत्यू नोंद घेणे बाबत. अर्ज क्रं. ०१/२०२६

विषय :– जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारीत आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबत.

संदर्भ:– अर्जदार श्री दत्तात्रय देवराव पवार रा. होटाळा यांचे अर्ज दिनांक १६.०१.२०२६

ज्याअर्थी, अर्जदार श्री दत्तात्रय देवराव पवार रा. होटाळा ता. नायगाव जि. नांदेड यांनी त्यांचा मुलगी नामे श्री सुरेखा दत्तात्रय पवार रा. होटाळा यांचा जन्म दिनांक :– १२.०४.१९८० अर्जात नमुद रोजीची नोंट करुण देणे बाबत विनंती केली आहे तसेच अर्जदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय होटाळा ता. नायगाव जिल्हा नांदेड येथे जन्माच्या दाखल्याची मागणी अर्ज दिला असता संबंधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्राम पंचायत कार्यालय होटाळा ता. नायगाव जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९८९ च्या कलम ११ अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दिनांक १२.०१.२०२६ रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३(३) जन्म व नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय होटाळा ता. नायगाव जि. नांदेड यांना जन्म/मृत्यू नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. या जाहिरप्रगटन व्दारे वर्तमानपत्रात प्रसध्दी करण्यात येत आहे.जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर मा. न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

**तहसीलदार तथा दंडाधिकारी**
**नायगाव (खै)**

## जाहीर प्रगटन

तहसील कार्यालय, हदगाव
(जाहीर प्रगटन मार्फत तलाठी सज्जा शिबदरा)

विषय– मौ. जगापूर ता. हदगाव येथील गट क्र.१९२ क्षेत्र क्षेत्र ६ हे. ३३ आर पैकी क्षेत्र ० हे ७७ आर च्या ७/१२ वरील धोंडीबा भिवा व गंगाराम लाल्या या साधा कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत.

संदर्भ – श्रीमती शकुंतला नामदेव साखरे रा. जगापूर ता. हदगाव यांचा अर्ज दि.०५.१२.२०२५.

उपरोक्त विषयी संदर्भीय विनंती अर्जाचे श्रीमती शकुंतला नामदेव साखरे रा. जगापुर ता.हदगाव जि.नांदेड यांनी मौ. जगापुर ता. हदगाव येथील गट क्र.१९२ क्षेत्र क्षेत्र ६ हे. ३३ आर पैकी क्षेत्र ० हे ७७ आर च्या ७/१२ वरील धोंडीबा भिवा व गंगाराम लाल्या या साधा कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

अर्जदार यांनी सादर केलेल्या ७/१२ चे अवलोकन केले असता मौ. जगापुर ता. हदगाव येथील गट क्र.१९२ क्षेत्र क्षेत्र ६ हे. ३३ आर पैकी क्षेत्र ० हे ७७ आर ७/१२ वर धोंडीबा भिवा व गंगाराम लाल्या या साधा कुळाची नोंद दिसून येते, करीता याद्वारे. जगापुर ता. हदगाव येथील गट क्र.१९२ क्षेत्र क्षेत्र ६ हे. ३३ आर पैकी क्षेत्र ० हे ७७ आर मधील इतर अधिकारातील नमुद सधा कुळ धोंडीबा भिवा व गंगाराम लाल्या (१००९२) कुळधारक अथवा त्यांचे वारसदार किंवा इतर कोणी हितसंबंधी व्यक्ती यांना कळविण्यात येते की, सदर कुळ कमी करणे बाबत कोणाचे काही आक्षेप असल्यास १५ दिवसाचे आत उक्त नोंदी संबधी तहसिलदार, हदगाव किंवा ग्राममहसूल अधिकारी, शिबदरा यांचे कार्यालयात व्यक्तीशः हजर राहून लेखी स्वरूपात पुराव्यासह हरकत नोंदविण्यात यावी. मुदतीत आक्षेप किंवा हरकत न मिळाल्यास धोंडीबा भिवा व गंगाराम लाल्या या साधा कुळाची नोंद कमी करण्यासाठी कुणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून प्रकरणात नियमानुसार संरक्षित कुळाची नोंद कमी करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तहसीलदार,**
**हदगाव**

जा. क्र. सीआर/६२०/–
कार्यालय उमरी नगरपालिका उमरी
दि.२७/०३/२०२६

## जाहीर प्रगटन

विषय–नाव परिवर्तन करणे बाबत.

श्री माधव गोविंद कंधारे रा. बाचेगाव, ता. धर्माबाद, जि. नांदेड सर्व्हे नं. (३/२/१) पैकी प्लॉट नं. (०४) वार्ड न. (०१) न.पा.मा.क्र.(२४८) झोन क्र. २, न.मा.क्र.(२१४९) या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासीयांना जाहीररित्या कळविण्यात येते की, श्री राघोजी रानबा मदने रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची व उमरी सर्व्हे नं. (३/२/१) पैकी प्लॉट नं. (०४) वार्ड न. (०१) न.पा.मा.क्र.(२४८) झोन क्र. २, न.मा.क्र.(२१४९) ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस - प्लॉट नं. १३, पश्चिम– रस्ता, दक्षिण -प्लॉट नं. ५, उत्तर : प्लॉट नं. ३.

खरेदी खत बयनामा रजिस्ट्री/वाटणी पत्रक क्र. (४४०/२०२६) दि. २३/३/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. वारसाहक्काने मालकी हक्क प्राप्त झाला आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता/रिव्हीजन रजिस्टरमध्ये माधव गोविंद कंधारे यांच्या नावाने नोंद घेण्यात येत आहे.

ज्या कोणा नातेवाईक, भाऊबंद, हितसंबंधितास वरीलप्रमाणे नोंद परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह (कागदपत्र) या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, उमरी.**

जा. क्र. सीआर/४६०/–
कार्यालय उमरी नगरपालिका उमरी
दि.१२/०३/२०२६

## जाहीर प्रगटन

विषय–नाव परिवर्तन करणे बाबत.

श्री गंगाधर शंकर मनूरकर रा. उमरी, सर्व्हे नं. (१६३/३) पैकी प्लॉट नं. (१३४) वार्ड न. (०९) न.पा.मा.क्र.(–) झोन क्र. ३ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासीयांना जाहीररित्या कळविण्यात येते की, श्री गणेश येताळे रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची व उमरी सर्व्हे नं. (१६३/३) पैकी प्लॉट नं. (१३४) वार्ड न. (०९) न.पा.मा.क्र.(–) झोन क्र. ३. ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस – व्यंकटेश नगर , पश्चिम– ५ मीटर रुंद रोड, दक्षिण -५ मीटर रुंद रोड, उत्तर : प्लॉट नं. ३६.

खरेदी खत बयनामा रजिस्ट्री/वाटणी पत्रक क्र. (१३७९) दि. २१/६/१९९५ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. वारसाहक्काने मालकी हक्क प्राप्त झाला आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता/रिव्हीजन रजिस्टरमध्ये गंगाधर शंकर मनूरकर रा. उमरी यांच्या नावाने नोंद घेण्यात येत आहे.

ज्या कोणा नातेवाईक, भाऊबंद, हितसंबंधितास वरीलप्रमाणे नोंद परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह (कागदपत्र) या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, उमरी.**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## पश्चिम विभागीय खो-खो स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विजयी

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित पश्चिम विभागीय खो-खो (मुले) स्पर्धेचा दि. ६ एप्रिल रोजी उत्साहात समारोप झाला. पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.




स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वितीय, यजमान विद्यापीठ तृतीय तर मुंबई विद्यापीठाने चतुर्थ क्रमांक मिळविला. स्पर्धेत एकूण ५८ संघांचा सहभाग होता.

स्पर्धेच्या समारोपप्रसंगी बक्षीस वितरण सोहळा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, बाबा कुलदीपसिंग महाराज, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव डॉ. चंद्रजीत जाधव तसेच विभागीय सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले, एआययूचे स्पर्धा निरीक्षक डॉ. जगदीश गस्थी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, नारायण चौधरी, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर डॉ. पराग खडके, अधीसभा सदस्य युवराज पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, स्पर्धा समन्वयक डॉ. पवन पाटील आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

विजेत्या, उपविजेत्या तसेच तृतीय आणि चौथा क्रमांकाच्या संघांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी तसेच पदक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत पुढील वाटचालीस मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अधिसभा सदस्य डॉ. महेश बेंबडे, डॉ. महेश वाखरडकर, डॉ. माधव कदम, डॉ. अशोक चाटसे, डॉ. शिवानंद पाटील, डॉ. गणेश मनगिरे, क्रीडा विभागातील संजयसिंह ठाकुर, रामा किरकन, शिवाजी हंबर्डे, सुनील लुटे, रतनसिंग पुजारी यांनी अथक परिश्रम घेतले.

या स्पर्धेसाठी पंचप्रमुख प्रशांत पाटणकर, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे स्पर्धा निरीक्षक संदीप तावडे, संतोष सावंत, प्रभाकर काळे, दीपक सपकाळ, रणजीत जाधव, अंकुश चव्हाण, सचिन तहानिक, अमोल मुरकुळे, सुजित माळी आदींनी पंच म्हणून जबाबदारी पार पडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. भीमा केंगले यांनी केले. शिस्तबद्ध नियोजन आणि उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे स्पर्धा सुरळीत पार पडली. या स्पर्धेमुळे खो-खो क्रीडेचा रोमांच अनुभवायला मिळाला असून मराठवाड्याच्या क्रीडा परंपरेला नवे बळ मिळाल्याचे मत क्रीडाप्रेमींनी व्यक्त केले.

## खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांचे अमृत संस्थेमार्फत आजपासून सर्वेक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)** –खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेमार्फत राज्यभर सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात आली असून, नांदेड जिल्ह्यात ८ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत हे सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था किंवा महामंडळांमार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी अमृत संस्था कार्यरत आहे.

अमृतच्या लक्षित गटामध्ये सध्या ब्राह्मण, सिंधी, हिंदू मारवाडी, गुजराती, पटेल, राजपूत, राजपुरोहित, हिंदू नेपाळी, बनिया, कम्मा, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, येलमार, ठाकूर, त्यागी, सेनगूनथर, जाट, कानबी, कोमटी/वैश्य अशा २५ जातींचा समावेश करण्यात आला असून, सर्वेक्षणाअंती या यादीत वाढ होण्याची शक्यता आहे.

संस्थेमार्फत व्यक्तिमत्व विकास, औद्योगिक व उन्नत कौशल्य विकास, रोजगारक्षम कौशल्य विकास, उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाह्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन तसेच उद्योग व्यवसाय वृद्धीसाठी वैयक्तिक व्याज परतावा योजना अशा विविध योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. यामध्ये लक्षित गटाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध वयोगटातील लाभार्थ्यांसाठी मूल्यवर्धित योजना तयार करण्याचा मानस आहे.

या पार्श्वभूमीवर लक्षित गटातील कुटुंबांची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे तसेच उपलब्ध स्थानिक संसाधने, कौशल्य व आवडीच्या आधारे योजना आखण्यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे. हे सर्वेक्षण दि. ८ एप्रिल २०२६ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत होणार असून, आवश्यकता भासल्यास कालावधी वाढविण्यात येईल.

अमृतच्या लक्षित गटातील नागरिकांनी सर्वेक्षणासाठी आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक सौरभ संतोष माळहिप्परगेकर यांनी केले आहे.

## जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांविरोधातील पत्नीसह मुलांच्या उपोषणाकडे दुसऱ्या दिवशीही प्रशासनाने फिरवली पाठ

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेडचे जिल्हापुरवठा अधिकारी जगदीश बारदेवाड यांच्या पत्नी व मुलांनी दि. ६ एप्रिलपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण आरंभीले आहे. त्यांच्या उपोषणाचा मंगळवारी दुसरा दिवस होता. जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या पत्नी व मुलांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आरंभिलेल्या उपोषणाकडे अद्यापही जिल्हा प्रशासनाने लक्ष दिले नाही. या प्रकारामुळे उपोषणकर्त्यांची प्रकृती मंगळवारी दुसऱ्या दिवशी खालावली असल्याचे सांगण्यात येते.



सोमवार, दि. ६ एप्रिलपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नांदेडचे जिल्हापुरवठा अधिकारी जगदीश बारदेवाड यांच्या पत्नी सौ. दैवशाला जगदीश बारदेवाड व त्यांच्या मुलांनी न्याय्य मागण्यांसाठी उपोषण पुकारून न्याय मिळावा अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुलांच्या पालनपोषणाचा तसेच शैक्षणिक खर्च पतीने करावा, मुलांचे जातींचे प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे देण्यात यावे, सेवापुस्तिकेवर मुलासह पत्नीचे नाव नोंदवावे, पत्नी व मुलांना न सांगता गत दोन वर्षांपासून घराबाहेर राहत असल्यामुळे मुलांना वडिलांचे प्रेम मिळत नाही त्यासाठी घरी येऊन मुलासोबत राहणे, तसेच घराचे थकीत हप्ते न भरल्याने घराची जप्ती होत आहे. तेव्हा सदरील हप्ते नियमितपणे भरावेत या महत्वपूर्ण व न्यायिक मागण्यांचा निवेदनारत समावेश आहे.

मंगळवारी उपोषणाचा दुसरा दिवस होता. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी प्रशासनाने दखल घेतली नसल्याने आंदोलनकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे.

## नांदेड शहरात पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन; अनेक आरोपींची घेतली झाडाझडती

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने ६ ते ७ एप्रिल दरम्यान १७ तासांचे कोम्बिंग ऑपरेशन राबविले. त्यात १११ सराईत गुन्हेगारांची तपासणी तर १५ सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत नांदेड शहरात केवळ ४ दिवसांत ६ खून झाले आहेत. त्यामुळे शहरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस दलाने ६ व ७ एप्रिल दरम्यान शहरात जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली कोम्बिंग ऑपरेशन राबविले. या ऑपरेशनमध्ये इतवारा पोलीस ठाण्याचे ६ पथक, वजिराबाद पोलीस ठाण्याचे २, ग्रामीण पोलीस ठाण्याचे १ तर स्थानिक गुन्हा शाखेचे ३ पथक असे एकूण



१५ पथक सहभागी झाले होते. या पथकांनी १५ सराईत गुन्हेगारांवर कारवाई केली. दरम्यान या ऑपरेशनमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, नांदेड शहर, इतवारा, कंधार, बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी, प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, अधिकारी व अंमलदार, शहरातील पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार तसेच कुंटूर, रामतीर्थ, सोनखेड, उस्माननगर, लिंबगाव ठाण्याचे प्रभारी यांनी सहभाग नोंदविला होता.

यावेळी त्यांनी ६९ सराईत गुन्हेगार, ३० आर्म अॅक्टचे गुन्हेगार, १२ जणांवर भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हे दाखल करून तव्वल १११ सराईत गुन्हेगारांची तपासणी केली. त्यात मालमत्ता व शरीराविरुद्धचे गुन्हे, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार, तडीपार आरोपी, हिस्ट्रीशीटर, सराईत गुन्हेगार यांचा समावेश होता.

## पद्माकरराव कनकदंडे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील पद्माकरराव केशवराव कनकदंडे यांचे मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांची अत्यंयात्रा बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता त्यांचे राहाते घर ज्ञानेश्वर नगर नांदेड येथून निघणार आहे. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली व नातवंडे आहेत.

## सुरेश देशपांडे गुरुजी यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**– श्री शंकरराव चव्हाण विद्यालय, कोलंबी ता. नायगाव येथील गणित विषयाचे शिक्षक सुरेश प्रभाकरराव देशपांडे नांदेड यांचे दीर्घकालीन आजाराने मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री १२.३० वाजता निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. ७ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता गोवर्धनघाट, नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, तीन बहिणी, मेव्हण असा परिवार आहे.

## पोलिसांच्या सतर्कतेमुळे दरोड्याचा डाव फसला; ग्रामीण पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या तुप्पा परिसरामध्ये दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना गस्तीवर असलेल्या नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून घातक शस्त्र व अन्य साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई ६ एप्रिल रोजी पहाटे दोनच्या सुमारास करण्यात आली.

शहराला लागून असलेल्या तुप्पा पाटीजवळ एखादा दरोड्यासारखा गंभीर गुन्हा करण्याच्या बेतात अंधारात दबा धरून पाच आरोपी बसले होते. यावेळी नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे पथक रात्रीला गस्तीवर होते. यावेळी पथकाने दबा धरून बसलेल्या सुमित संतोष सरोदे (वय २० रा. सिडको नांदेड), अजय उर्फ लड्ड्या भगवान जोगदंड (वय २३ रा. सिडको), विजय दिगंबर बोईनवाड (वय २५ रा.गंगनबीड तालुका कंधार), मनोहर दत्तात्रय गौळकर (वय २९ रा. पेठशिवनी ता. पालम) आणि सोमनाथ बंडू नरवाडे (वय २३ रा. सोनखेड ता. नांदेड) यांनी संघटित होऊन दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना पोलिसांच्या जाळ्यात अडकले.

पोलिसांनी त्यांच्याकडून एक खंजर, रॉड, तलवार, लाल मिरची पावडर, नायलॉन दोरी असे साहित्य जप्त केले. पोलीस अंमलदार गवेंद्र सिरमलवार यांच्या फिर्यादीवरून वरील पाच जणांविरुद्ध दरोड्यासह भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक मटवाड करत आहेत.




**नांदेड** – अनु.जाती अंतर्गत आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी या मागणीसाठी मातंग समाजातील विविध संघटनांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले त्याप्रसंगीचे छायाचित्र. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## भाजपा अनुसूचित जाती मोर्चा महानगर कार्याध्यक्षपदी दलित मित्र माधव अंबटवार तर उपाध्यक्षपदी आनंदा गायकवाड



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– भाजपा अनुसूचित जाती मोर्चा महानगर नांदेड कार्याध्यक्षपदी दलित मित्र माधव अंबटवार तर उपाध्यक्षपदी आनंदा गायकवाड यांची नियुक्ती भाजपा महानगर अध्यक्ष माजी आमदार अमर राजूरकर व अनुसूचित जाती मोर्चा महानगराध्यक्ष जनार्दन गुपीले यांनी केली आहे. या नियुक्तीचे पत्र माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते कुसुम सभागृह नांदेड येथे नुकतेच देण्यात आले.

नांदेड येथील कुसुम सभागृह येथे भाजपा पक्षाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, महानगर अध्यक्ष माजी आमदार अमर राजूरकर व भाजपा प्रदेश सदस्य चैतन्यबापू देशमुख, प्रवीण साले, शीतल खांडील, डॉ. सचिन उमरेकर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.

भाजपा अनुसूचित जाती मोर्चाच्या कार्याध्यक्षपदी माधव आंबटवार तर उपाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते आनंदा गायकवाड, सेवानिवृत्त अधिकारी आर. जे. वाघमारे, दया वाघमारे, तर सरचिटणीसपदी सुरेश कांबळे, सुनिल देवकांबळे, राहुल वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे नवीन नांदेड परिसरासह शहरी भागातील अनेकांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

पक्षश्रेष्टींनी टाकलेल्या विश्वासास पात्र राहून पक्ष वाढीसाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

## शहरातील गुन्हेगारी प्रवृत्ती विरोधात विशेष मोहीम राबवा -जिल्हाध्यक्ष राजेश पावडे

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात व विशेषतः शहरात वाढती गुन्हेगारी, खून प्रकरणे, अवैध वाहतूक आदींमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. याकरिता विशेष मोहीम राबवून गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालावा, अशी मागणी खा. रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांच्या नेतृत्वात शहर व जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे मंगळवार, दि. ७ एप्रिल रोजी करण्यात आली.




> नांदेड शहरासह जिल्ह्यात गुन्हेगारी प्रंचड वाढली आहे. नुकत्याच घडलेल्या खुनाच्या घटना पहाता, प्रशासनाची वचक राहिली नाही का? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडत आहे. त्यामुळे विशेष मोहीम राबवून गुन्हेगारी मोडीत काढावी, अशी मागणीही कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांनी केली आहे.

अलीकडच्या काळात नांदेड जिल्ह्यासह विशेषतः शहरातील कायदा सुव्यवस्था नियंत्रणाबाहेर गेली असून, अवघ्या तीन दिवसांत पाच खून झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याकरिता विशेष मोहीम राबवून गुन्हेगारी मोडीत काढावी अशी मागणी खा. रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांच्या नेतृत्वात शहर व जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, प्रदेश सरचिटणीस डॉ. रेखा चव्हाण, महेश देशमुख तरोडेकर, बालाजी चव्हाण, आनंद चव्हाण, अब्दुल गफार, महिला कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष आरती डोईबळे, मुन्ना अब्बास, दीपक हुजुरीया, संजय वाघमारे, अजिज कुरेशी, रमेश गोडबोले, बापूसाहेब पाटील, सत्यजित बिराजदार, मधुकर दिघे, नागराज सुलगेकर, ज्योती कदम, रमेश चित्ते, अभिलाष पावडे, डॉ. रत्नदिप गच्चे, आंबादास रातोळे, अब्दुल बाखी, गौतम सिरसाट, नंदकिशोर देशमुख, रामचंद्र गायकवाड, मधुकर सोनटक्के, शेख मुख्तार आदींसह इतर पदाधिकारी कॉंग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com